# मानवाधिकार
# आणि
# एलजीबीटीआयक्यू (LGBTIQ)

**(समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी(पारलिंगी), द्विलिंगी व क्विअर समाज)**

तुमचे ज्ञान पडताळून पहा

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC)**
**परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी**

**बिंदुमाधव खिरे**

प्रथम आवृती, डिसेंबर २०२३

# मानवाधिकार
# आणि
# एलजीबीटीआयक्यू (LGBTIQ)
**(समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी(पारलिंगी), द्विलिंगी व क्विअर समाज)**

तुमचे ज्ञान पडताळून पहा

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC)**
**परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी**

लेखक- **बिंदुमाधव खिरे**

(c) Bindumadhav Khire. All Rights Reserved.

प्रकाशक- बिंदू क्विअर राईट्स फाऊंडेशन (पुणे)

भारत. प्रथम आवृती, डिसेंबर २०२३

संपर्क:  bindumadhav.khire@gmail.com

'एलजीबीटीआयक्यू (लेसबियन, गे, बायसेक्स्यूअल, ट्रांन्सजेंडर, इन्टरसेक्स, क्विअर)- यांच्या विषयी तुमचे ज्ञान पडताळून पहा'- ही मार्गदर्शक पुस्तिका, स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांकरिता लिहीली आहे. या पुस्तिकेत प्रश्नसंच आणि उत्तरपत्रिका, माहितीच्या टिपांसह देण्यात आली आहे.

**अस्वीकारण**
सर्व हक्क राखीव. या मार्गदर्शिकेचा कोणताही भाग कोणत्याही स्वरुपात, समिक्षात्मक लेखांमध्ये लिहिलेली अवतरणे किंवा परिक्षणात वापरण्याचा अपवाद वगळता, कोणत्याही पद्धतीने इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिक, छायांकिताद्वारे, ध्वनीमुद्रणाद्वारे किंवा इतर कोणत्याही पद्धतीने माहितीची साठवणूक करण्यासाठी किंवा परत मिळवण्यासाठी प्रकाशकाची किंवा लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**संगणकीय प्रत (e-copy in .pdf format) मोफत उपलब्ध**
(Download from website: http://www.bindumadhav.com)

**पुस्तक प्रत** (Hardcopy): किंमत: २५/- (पंचवीस रुपये फक्त)

## ऋणनिर्देश

माजी पोलीस सहाय्यक आयुक्त भानुप्रताप बर्गे साहेब यांनी ही मार्गदर्शिका तपासून महत्वपूर्ण सुचना केल्या, त्याबद्दल मी त्यांच्या विषयी मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. पुण्यात मी एलजीबीटीआयक्यू अधिकारांसाठी करत असलेल्या कामाला, त्यांचा २०११ पासून खंबीर पाठींबा लाभला आहे. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही, साहेब या कामाला भक्कम आधार देत आहेत. या साठी त्यांचे पुनश्च: मन:पूर्वक आभार मानतो.

डॉ. रमण गंगाखेडकर (माजी संचालक राष्ट्रीय एड्स संशोधन संस्था आणि आय.सी.एम.आर. साथरोग विभागाचे प्रमुख), डॉ. ज्योती शेट्टी (मानसोपचार विभाग प्रमुख, भारती हॉस्पीटल व वैद्यकीय महाविद्यालय), आ. इटुबोणे आणि डॉ. मृदूला आपटे (मानशशास्त्रज्ञ) या सर्वांनी या पुस्तिकेचे अवलोकन करून, पुस्तिकेचे स्वरुप आणि प्रश्नावली या बाबत मार्गदर्शन केले या साठी मी त्यांचा आभारी आहे. एलजीबीटीआयक्यू ॲक्टिविस्ट अनिल उकरंडे, त्रिनय गौडा (ट्रान्समन) व एच.आय.व्ही./एड्स समुपदेशक अमोल शिंदे यांनी ही पुस्तिका वाचून महत्वाचा सूचना केल्या. या सर्वांचे मनापासून आभार.

ही पुस्तिका तयार करण्याच्या उपक्रमामध्ये स्पर्धा परिक्षेसाठी मार्गदर्शन वर्ग चालवणाऱ्या 'रयत प्रबोधिनी' पुणे, या संस्थेने मला पाठींबा दिला. 'रयत प्रबोधिनी'चे संचालक श्री उमेश कुदळे आणि श्री. विशाल सुतार, निरिक्षक उद्देश पवार यांनी मला जे सहाय्य केले त्या बद्दल मी त्यांचे आभार मानतो. 'परिवर्तन संस्थे'चे श्री किशोर ढगे यांनी मला 'रयत प्रबोधिनी' सोबत काम करण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

स्पर्धा परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक वर्ग चालवणाऱ्या 'स्वरुपवर्धिनी' पुणे, यांची मला मोलाची मदत झाली. 'स्वरुपवर्धिनी' संस्थेचे कार्यकर्ते, श्री निलेश धायरकर आणि श्री. चंदन हयगुंडे यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

कायदेतज्ज्ञ श्री. आशिष अग्रवाल यांनी कायद्याच्या बाबतीत मार्गदर्शन केले. श्रीमती अनुपमा पाठक यांनी मराठी अनुवाद केला व मुद्रितशोधन केले. श्री. सुरेश खोले यांनी मुद्रांकन केले. चंद्रशेखर बेगमपुरे यांनी छपाईचे काम पाहिले. या सर्वांचे मनापासून आभार.

या व्यतिरिक्त अनेक व्यक्तींनी मला मोलाची मदत केली पण ते आपली ओळख उघड करू इच्छीत नाहीत. या सर्व व्यक्तींनी केलेल्या बहुमोल मदतीबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

बिंदुमाधव खिरे

डिसेंबर २०२३

# लघूरुपे

| | |
|---|---|
| AIDS | अक्वायर्ड इम्युनोडेफिशिऐनसी सिन्ड्रोम (Acquired Immunodeficiency Syndrome) |
| ART | अँटी रेट्रोव्हायरल थेरपी (Anti Retroviral Therapy) |
| CrPC | फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (Criminal Procedure Code, 1973) |
| DOTS | डायरेक्टली ऑब्सर्वड थेरपी शॉर्ट कोर्स (क्षयरोगासाठी औषधं) (Directly Observed Therapy Short Course) (Treatment for TB) |
| HIV | ह्युमन इम्युनोडेफिशिऐनसी व्हायरस (Human Immunodeficiency Virus) |
| ICC (or IC) | इंटर्नल कंप्लेन्ट्स कमिटी (Internal Complaints Committee (or Internal Committee)) |
| IPC | भारतीय दंडविधान संहिता, १८६० (Indian Penal Code, 1860) |
| IPS | भारतीय मानसोपचारतज्ज्ञ संस्था (Indian Psychiatric Society) |
| PEP | पोस्ट एक्सपोजर प्रोफायलॅक्सिस (Post Exposure Prophylaxis) |
| PrEP | प्री-एक्सपोजर प्रोफायलॅक्सिस (Pre-Exposure Prophylaxis) |
| TB | क्षयरोग (Tuberculosis) |
| VDRL | व्हेनेरल डिसिज रिसर्च लॅबोरेटरी (Venereal Disease Research Laboratory) |
| WPA | जागतिक मानसोपचारतज्ज्ञ संघटना (World Psychiatric Association) |

# अनुक्रमणिका


प्रस्तावना, पुस्तिकेची रचना व सूचना ०६

भाग अ: प्रश्नसंच
- प्रभाग १- प्राथमिक माहिती ०८
- प्रभाग २– वैद्यकीय
  - अ) मानसिक आरोग्य ०९
  - ब) शारीरिक आरोग्य १०
- प्रभाग ३- सामाजिक मुद्दे १२
- प्रभाग ४- कायदे १३

भाग ब: उत्तरसंच व टिपा
- प्रभाग १- प्राथमिक माहिती १६
- प्रभाग २- वैद्यकीय
  - अ) मानसिक आरोग्य १८
  - ब) शारीरिक आरोग्य १९
- प्रभाग ३- सामाजिक मुद्दे २१
- प्रभाग ४- कायदे २२

परिशिष्ट
- परिशिष्ट अ: शब्दकोश २६
- परिशिष्ट ब: बिंदुमाधव खिरे यांनी लिहीलेली पुस्तके २८
- परिशिष्ट क: लेखक परिचय २८

# प्रस्तावना, पुस्तिकेची रचना व सूचना

## पार्श्वभूमी

२५ ऑगस्ट २०२३ रोजी 'परिवर्तन संस्थे'ने 'परिवर्तन युवा संमेलन' आयोजित केले होते. या संमेलनातील चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी श्री. किशोर ढगे यांनी मला आमंत्रित केले. या चर्चासत्रात 'रयत प्रबोधिनी' संस्थेचे संचालक श्री. उमेश कुदळे सहभागी झाले होते. 'रयत प्रबोधिनी' ही, स्पर्धा परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक स्पर्धापरिक्षा मार्गदर्शन केंद्र चालवते.

या चर्चासत्रा दरम्यान मी, सहाय्यक पोलिस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे साहेबांनी एलजीबीटीआयक्यू समुदायाला दिलेल्या महत्वपूर्ण पाठींब्याविषयी सांगितले. त्यांच्या सारख्या अद्वितीय प्रेरक व्यक्तीमुळे एलजीबीटीआयक्यू समुदायातील अनेक शोषीतांना मोलाचा आधार मिळाला, हे ऐकून श्री. उमेश कुदळे यांनी अशी इच्छा व्यक्त केली की 'रयत प्रबोधिनी' संस्थेतील जे विद्यार्थी पी.एस.आय. (पोलिस उपनिरीक्षक पद, साल २०२३) निवडले गेले आहेत त्यांच्यासाठी एलजीबीटीआयक्यू समुदायाविषयी जाणीव जागृतीचे सत्र घ्यावे.

यानुसार ४ सप्टेंबर २०२३ रोजी 'रयत प्रबोधिनी'ने पत्रकार भवन येथे एलजीबीटीआयक्यू जाणीवजागृती कार्यशाळा आयोजित केली. माजी पोलिस सहाय्यक आयुक्त भानुप्रताप बर्गे साहेब यांना या कार्यशाळेसाठी आमंत्रित केले गेले. त्यांनी अशा जाणीवजागृती कार्यशाळेचं  महत्व सांगून अशा कार्यशाळा घेण्याची गरज अधोरेखीत केली.

या नंतर मी (प्रस्तुत पुस्तिका लेखक- बिंदुमाधव खिरे) एलजीबीटीआयक्यू विषयी मांडणी केली. या मांडणी नंतर एलजीबीटीआयक्यू समुदायातील तीन व्यक्तींच्या छोट्या मुलाखती घेण्यात आल्या- प्रियदर्शन (समलिंगी पुरुष), त्रिनय (तृतीयपंथी पुरुष), आणि नंदिनी (तृतीयपंथी स्त्री). या मुलाखती नंतर प्रश्नोत्तराचे सत्र झाले.

या कार्यशाळेला उपस्थित असणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांकडून मला अतिशय सकारात्मक आणि भारावून टाकणारा प्रतिसाद मिळाला. त्यांचा प्रतिसाद बघून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एलजीबीटीआयक्यू विषयी प्रश्नोत्तरे स्वरुपात माहिती देणारी पुस्तिका लिहावी असा विचार माझ्या मनात आला. या नंतर मी स्पर्धापरीक्षांच्या अनेक प्रश्नपत्रिका आणि उत्तरसंच तसेच वेगवेगळी मार्गदर्शक पुस्तके, गाईड यांचा आढावा घेतला आणि या अशा स्पर्धापरीक्षा मार्गदर्शक पुस्तिकांच्या धर्तीवर ही मार्गदर्शक पुस्तिका लिहिली. ही पुस्तिका इंग्रजीत व मराठीत तयार केली आहे व दरवर्षी आवश्यक त्या बदलासह नवीन माहितीचा समावेश करुन ही पुस्तिका पुन: प्रकाशित करण्याचा माझा विचार आहे.

## उद्देश/उद्दिष्ट

गेल्या काही वर्षांमध्ये एलजीबीटीआयक्यू संबंधित भारतातील कायदे आणि वैद्यकिय दृष्टिकोन या मध्ये सकारात्मक बदल घडला आहे. एलजीबीटीआयक्यू संबंधित मुद्यांबाबत जाणीव जागृती वाढत असताना आणि हे मुद्दे पुढे येत असताना, शासकिय सेवेतील व्यक्तिंना या मुद्यांबाबत पुरेशी समज असणं, हे मुद्दे संवेदनशीलतेनी हाताळता येणं अत्यंत महत्वाचं आहे.

महत्वाचा प्रश्न असा की प्रशासकीय सेवेत नव्याने भरती होणाऱ्यांना एलजीबीटीआयक्यू समुदायांच्या मुद्यांविषयी माहिती असते का? याचं उत्तर 'नाही' असं आहे. याचं प्राथमिक कारण असं की, अजूनही एलजीबीटीआयक्यू हा विषय उघडपणे बोलला जात नाही, शिकवणी वर्गात चर्चिला जात नाही. यामुळे प्रशासकीय सेवेतील व्यक्ती या विषयाची कोणतीही कायदेशीर बाजू निरपेक्षपणे समजून न घेता निर्णय घेण्याची आणि धोरणे राबवण्याची शक्यता असते ज्या मुळे अंतिमतः एलजीबीटीआयक्यू समुदायावर अन्यायकारक नियम, अटी लादले जावू शकतात.

अशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेषत: एमपीएससी (MPSC) (महाराष्ट्र लोकसेवा आयोग), युपीएससी (UPSC) (केंद्रीय लोकसेवा आयोग) सारख्या प्रशासकीय सेवेत भरती होण्यासाठी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना लिंग, लैंगिकता आणि लिंगभाव या बाबतीत अल्पसंख्य असणाऱ्या समुदायाबद्दल माहिती असणं, त्यांच्या समस्यांची जाणीव असणं (त्यांना परिक्षेत या वर प्रश्न विचारले जाणार असतील अथवा नसतील तरीही) हे आताच्या गतीने बदलणाऱ्या काळासाठी अत्यंत गरजेचे आहे. या अभ्यासामुळे ते सेवेत कार्यरत असताना जेव्हा त्यांच्या समोर या समुदायाचे मुद्दे येतील तेव्हा ते हाताळण्यासाठी ते सक्षम होतील.

## पुस्तिकेची रचना व सूचना

भाग 'अ' मध्ये प्रश्नावलीचे ४ भाग आहेत. प्रत्येक भाग एलजीबीटीआयक्यू च्या विशिष्ठ पैलूशी निगडीत आहे. प्रत्येक भागात एकोत्तरी प्रश्न किंवा बहुत्तरी प्रश्नांचा संच दिला आहे. प्रत्येक प्रश्नाखाली उत्तरांचे पर्याय दिले आहेत.
भाग 'ब' मध्ये प्रश्नांच्या अचूक उत्तराचा संच दिलेला आहे. केवळ योग्य उत्तरे पुरवून विषयाचे पुरेसे आकलन होणार नाही म्हणून प्रत्येक उत्तराअंती त्या प्रश्नामध्ये विचारलेल्या मुद्याची पुरेशी स्पष्टता यावी यासाठी टिपाही दिलेल्या आहेत.

परिशिष्ट 'अ' मध्ये या विषयासंदर्भातील विविध व्याख्या दिल्या आहेत.  विद्यार्थ्यांनी या विषयावर अधिक वाचन करावे या उद्देशाने परिशिष्ट 'ब' मध्ये मराठी आणि इंग्रजीतील विविध संदर्भ पुस्तकांची यादी दिली आहे. हे सर्व वाचनसाहित्य पीडीएफ (.pdf) फाईलच्या स्वरुपात http://www.bindumadhav.com संकेत स्थळावरून मोफत डाऊनलोड करता येते.

bindumadhav.khire@gmail.com या ई-मेल वर तुमच्या सूचना, दुरुस्त्या, प्रतिक्रिया जरूर पाठवाव्या. या पुस्तिकेच्या पुढील सुधारीत आवृत्तीसाठी तुमचा प्रतिसाद मोलाचा ठरेल.

**भाग**
भाग अ- ४ विभागात असलेली प्रश्नपत्रिका.
एकूण एकोत्तरी प्रश्न/बहुत्तरी प्रश्न- ६५ (प्राथमिक माहिती- १२, आरोग्य- २२ (मानसिक- ८, शारीरिक- १४), सामाजिक- १२, कायदा- १९)
प्रश्न सोडवण्याचा कालावधी- ४० मिनिटे.

भाग ब- प्रश्नपत्रिका सोडवल्यावर, विद्यार्थ्यांनी स्वयंअध्ययन आणि स्वयंमूल्यमापनासाठी भाग 'ब' मधील उत्तरसंच आणि टिपा वाचायच्या आहेत. यासाठी किमान एक तासाचा कालावधी लागणे अपेक्षित आहे.

**सूचना**
1) हा प्रश्नसंच स्वयंअध्ययना करिता असल्यामुळे या प्रश्नांना गुण दिलेले नाहीत.
2) SRQ (Single Response Question) - (एकोत्तरी प्रश्न)
3) MRQ (Multiple Response Question) – (बहुत्तरी प्रश्न)

## भाग अ: प्रभाग १- प्राथमिक माहिती

**१. (SRQ) लिंग, लिंग भाव व लैंगिक कल हे समानअर्थी शब्द आहेत.**
अ] बरोबर
ब] चूक

**२. (SRQ) तृतीयपंथी (पारलिंगी) व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती की जिचे लैंगिक अवयव जन्मतः संदिग्ध असतात.**
अ] बरोबर
ब] चूक

**३. (SRQ) ज्या पुरुषाचं स्त्रीशी लग्न झालं आहे आणि जो अपत्याचा नैसर्गिक पिता आहे असा पुरुष पुढील पैकी कोण असू शकत नाही?**
अ] समलिंगी
ब] भिन्नलिंगी (विषमलिंगी)
क] सांगता येत नाही

**४. (MRQ) खालील ग्रंथांमध्ये समलैंगिकतेचे संदर्भ मिळतात**
अ] नारदस्मृती
ब] कामसूत्र
क] मनुस्मृती

**५. (SRQ) एखादा पुरुष समलिंगी आहे म्हणजे-**
अ] तो नपुंसक आहे
ब] त्याचा लिंगभाव आणि त्याची शरीररचना एकमेकांशी सुसंगत नाही
क] त्याला केवळ पुरुषांबद्दलच लैंगिक आकर्षण वाटते
ड] त्याला स्त्री आणि पुरुष दोघांबद्दल लैंगिक आकर्षण वाटते
इ] तो पुरुषासोबत लैंगिक संबंध करताना गमनी (पुरूषाची) भूमिका घेतो.
फ] तो पुरुषासोबत लैंगिक संबंध करताना स्वीकृत (स्त्रीची) भूमिका घेतो.

**६. (MRQ) समलैंगिकता यांच्या मध्ये दिसते-**
अ] काही मानव
ब] काही प्राणी
क] काही पक्षी

**७. (SRQ) लैंगिक आकर्षण आणि लैंगिक इच्छा दोन्ही एकच आहे.**
अ] बरोबर
ब] चूक

**८. (SRQ) अलैंगिक म्हणजे-**
अ] अशी व्यक्ती जिला स्त्री किंवा पुरुष कोणाचेच लैंगिक अवयव नाहीत.
ब] अशी व्यक्ती जिला स्त्री आणि पुरुष दोन्हींचे लैंगिक अवयव आहेत.
क] अशी व्यक्ती जिचे दीर्घकाळ कोणाशीच लैंगिक संबंध आलेले नाहीत.
ड] अशी व्यक्ती जिला दीर्घकाळ कोणाबद्दलच लैंगिक आर्कषण वाटत नाही.
इ] वरीलपैकी कोणतेही नाही.

**९. (SRQ) एलजीबीटीआयक्यू या मधील 'क्यू' म्हणजे-**
अ] अशी व्यक्ती जी आपल्या लिंग किंवा लिंगभाव किंवा लैंगिकता या विषयी गोंधळलेली आहे / याबाबत खात्री नाही / जी व्यक्ती या बाबत निश्चितपणे सांगू शकत नाही.
ब] लिंग, लैंगिकता, लिंगभाव या बाबतीत अल्पसंख्य असलेल्या व्यक्तींना एकत्रितपणे संबोधण्यासाठी वापरले जाणारे संबोधन.
क] वरील पैकी दोन्ही.
ड] वरील पैकी कोणतेही नाही.

**१०. (SRQ) नपुंसक म्हणजे-**
अ] असा पुरुष ज्याला पुरुषांविषयीचं लैंगिक आकर्षण वाटते.
ब] असा पुरुष ज्याच्या वीर्यात पुरुषबीजांची संख्या कमी आहे.
क] असा पुरुष ज्याच्या लिंगाला ताठरता येत नाही.
ड] असा पुरुष जो पुरुषाशी लैंगिक संबंध करताना स्वीकृत (स्त्रीची) भूमिका घेतो.
फ] असा पुरुष ज्याला कोणाही बद्दल लैंगिक आकर्षण वाटत नाही.

**११. जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| अ] लैंगिक कल | १.] स्त्री किंवा पुरुष म्हणून जगाचा अनुभव |
| ब] पुरुषबीजे | २.] स्त्री शरीर रचना |
| क] गर्भाशय मुख | ३.] पुरुष शरीर रचना |
| ड] लिंगभाव | ४.] तुम्ही कोणाकडे लैंगिकदृष्ट्या आकर्षित होता |
| इ] संदिग्ध शरीर रचना | ५.] वीर्यकोष |
| फ] पुरःस्थ ग्रंथी | ६.] द्विलिंगी |
| ग] वीर्य | ७.] वृषण/अंडकोष |

**१२. (MRQ) मानवामध्ये खालील पैकी कोणत्या विविधतांची गुंफण आढळून येते?**
अ) शरीर रचना पुरुष, लिंगभाव पुरुष, लैंगिक आकर्षण पुरुषांविषयी.
ब] शरीर रचना स्त्री, लिंगभाव पुरुष, लैंगिक आकर्षण तृतीयपंथीयांविषयी.
क] शरीर रचना द्विलिंगी, लिंगभाव स्त्री, लैंगिक आकर्षण स्त्रियांविषयी.
ड] शरीर रचना स्त्री, लिंगभाव स्त्री, लैंगिक आकर्षण कोणाही बद्दल नाही.

## भाग अ: प्रभाग २(अ)- मानसिक आरोग्य

**१. (SRQ) खालील वैद्यकिय वर्गिकरणानुसार समलैंगिकता हा आजार/विकृती नाही.**
अ] रोगांचे आंतरराष्ट्रीय वर्गिकरण (International Classification of Diseases)- V11.0
ब] विकारांची नैदानिक व सांख्यिकी नियमपुस्तिका (Diagnostics and Statistics Manual)– V5.0
क] भारतीय मानसोपचारतज्ज्ञ संस्थेने (IPS) जारी केलेले निवेदन.
ड] जागतिक मानसोपचारतज्ज्ञ संघटना (WPA) ने जारी केलेले निवेदन.
इ] वरील सर्व.

**२. (SRQ) 'जेंडर डिस्फोरिया' म्हणजे -**
अ] अशी व्यक्ती जी स्वतःला वाटणाऱ्या लैंगिक आकर्षणाबद्दल गोंधळलेली आहे.
ब] अशी व्यक्ती जिचा लिंगभाव तिच्या शारीरिक लिंगा पेक्षा वेगळा आहे.
क] अशी व्यक्ती जिचा लिंगभाव आणि शारीरिक लिंग यात एकरुपता (संलग्नता) आहे.
ड] वरीलपैकी कोणतेही नाही.

**३. (SRQ) व्यक्तीचा लैंगिक कल किंवा तिचा लिंगभाव बदलण्यासाठी करण्यात येणारी उपचार पद्धती म्हणजे 'कन्व्हर्जन थेरपी' ही अनैतिक आहे, व्यावसायिक गैरवर्तन आहे असे खालील कायद्यानुसार ठरवण्यात आलेले आहे-**
अ] भारतीय चिकीत्सा परिषद अधिनियम (National Medical Commission Act), २०२१
ब] मानसिक आरोग्यसेवा अधिनियम (The Medical Healthcare Act), २०१७
क] भारतीय वैद्यकीय परिषद, व्यावसायिक आचरण, शिष्टाचार आणि नैतिक नियम (Indian Medical Professional Conduct, Ethics and Etiquettes, Regulations), २००२
ड] वरील सर्व.
इ] वरील पैकी कोणतेही नाही.

**४. (MRQ) एलजीबीटीआयक्यू व्यक्तींना वैद्यकिय सेवा मिळताना होणारा भेदभाव / त्यांच्या विषयी दाखवलेली असंवेदनशीलता-**
अ] या मुळे रुग्ण आरोग्यसेवा, औषधपचार घेणे सोडून देतात.
ब] रुग्णाच्या आत्मविश्वासाचे खच्चीकरण होते.
क] भोंदू वैद्, बोगस डॉक्टर अशा व्यक्तींकडून उपचार घेतले जातात.
ड] सर्व डॉक्टर एलजीबीटीआयक्यू व्यक्तींचा तिरस्कार करतात असा गैरसमज बळावतो.

**५. (MRQ) 'जेंडर डिस्फोरिया' असल्याची शंका असणारी व्यक्ती जेव्हा, तिच्या मानसिकतेची चिकित्सा करुन घेण्यासाठी, मानसोपचारतज्ञा कडे जाते तेव्हा पुढील गोष्टींवर काम करावे लागते-**
अ] संबंधित व्यक्तीला 'जेंडर डिस्फोरिया'बद्दल स्पष्टता आहे का हे समजून घेणे.
ब] 'जेंडर डिस्फोरिया' वर उपचार करुन तो बरा करणे.
क] 'जेंडर डिस्फोरिया' असलेल्या व्यक्तीला एखादा मानसिक आजार आहे का हे समजून घेणे.

**६. (SRQ) 'जेंडर डिस्फोरिया' निदान करण्यासाठी खालील बाबींची पडताळणी करावी लागते-**
अ] व्यक्तीचे बालपण समजून घेणे.
ब] व्यक्तीच्या लैंगिक जीवनाविषयी माहिती घेणे.
क] व्यक्तीच्या लिंगभावासंदर्भात माहिती घेणे.
ड] व्यक्तीला आलेले वाईट अनुभव समजून घेणे.
इ] व्यक्तीची वेशभूषा, वर्तन.
फ] संबंधीत व्यक्तीला अगदी लहान वयापासून ओळखणाऱ्या व्यक्तीची मुलाखत घेणे व त्यांचे या व्यक्तीबद्दलचे निरीक्षण समजून घेणे.
ग] वरील सर्व.

**७. (SRQ) एखाद्या तृतीयपंथी(पारलिंगी) व्यक्तीला संप्रेरके घ्यायची असतील (हार्मोन थेरपी) किंवा लिंगबदल शस्त्रक्रिया करून घ्यायची असेल तर 'जेंडर डिस्फोरिया'चे निदान करणारी किती प्रमाणपत्रे सादर करणे गरजेचे आहे?**
अ] १
ब] २
क] ३
ड] एकही नाही

**८. (SRQ) ज्या तृतीयपंथी(पारलिंगी) व्यक्तीचे वय १८ वर्षं पूर्ण आहे अशा व्यक्तीने स्वखुशीने पुरुष जननेंद्रीये काढून टाकण्याची शस्त्रक्रिया करणे-**
अ] कायदेशीर आहे
ब] बेकायदेशीर आहे

## भाग अ: प्रभाग २(ब)- शारीरिक आरोग्य

**१. (SRQ) एखाद्या पुरुषाने दुसऱ्या व्यक्तीसोबत असुरक्षीत (कंडोम न वापरता) लैंगिक संबंध केल्यास, त्या पुरुषाने एच.आय.व्ही. ची तपासणी, असुरक्षित संभोग झाल्यानंतर ____ दिवसांनी करावी.**
अ] १ दिवस
ब] ४५ दिवस
क] ९० दिवस
ड] अन्य

**२. (MRQ) प्री-एक्सपोजर प्रोफायलॅक्सिस (Pre-Exposure Prophylaxis (PrEP)) औषध**
अ] ज्या पुरुषाचे अनेक व्यक्तींशी लैंगिक संबंध येतात अशा पुरुषाने, त्याला एच.आय.व्ही. ची लागण होण्याची शक्यता कमी व्हावी या साठी, प्रत्येक संभोगा दरम्यान कंडोमचा वापर करण्या बरोबरच हे औषध (PrEP) रोज घ्यायचे असते.
ब] ज्या पुरुषाचे अनेक व्यक्तींशी लैंगिक संबंध येतात अशा पुरुषाने, त्याला एच.आय.व्ही. ची लागण होण्याची शक्यता कमी व्हावी या साठी, प्रत्येक संभोगा दरम्यान कंडोमचा वापर करण्या ऐवजी हे औषध (PrEP) रोज घ्यायचे असते.
क] ज्या स्त्रीचे अनेक पुरूषांशी लैंगिक संबंध येतात अशा स्त्रीला एच.आय.व्ही. ची लागण होण्याची शक्यता कमी व्हावी या साठी, तिच्या पुरुष जोडीदाराने प्रत्येक संभोगा दरम्यान कंडोमचा वापर करायचा असतो व त्या स्त्रीने हे औषध (PrEP) रोज घ्यायचे असते.
ड] ज्या स्त्रीचे अनेक व्यक्तींशी लैंगिक संबंध येतात अशा स्त्रीला एच.आय.व्ही. ची लागण होण्याची शक्यता कमी व्हावी या साठी, तिच्या पुरुष जोडीदाराने प्रत्येक संभोगा दरम्यान कंडोमचा वापर करण्या ऐवजी त्या स्त्रीने हे औषध (PrEP) रोज घ्यायचे असते.

**३. (SRQ) पोस्ट एक्सपोजर प्रोफायलॅक्सिस (Post Exposure Prophylaxis (PEP)) औषध**
अ] ज्या पुरुषाचा एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीशी असुरक्षित (कंडोम न वापरता) लैंगिक संबंध आला आहे अशा पुरुषाने, त्याला जोडीदारापासून एच.आय.व्ही. ची लागण होण्याची शक्यता कमी व्हावी यासाठी लैंगिक संबंधा नंतर ७२ तासाच्या आत ही औषधे (PEP) घ्यायला सुरु करायची असतात.
ब] ज्या स्त्रीचा एच.आय.व्ही.संसर्गित पुरुषाबरोबर असुरक्षित (कंडोम न वापरता) लैंगिक संबंध झाला आहे अशा स्त्रीने, तिला पुरुष जोडीदारापासून एच.आय.व्ही.ची लागण होण्याची शक्यता कमी व्हावी यासाठी लैंगिक संबंधा नंतर ७२ तासाच्या आत ही औषधे (PEP) घ्यायला सुरु करायची असतात.

क] ज्या तृतीयपंथीयाचा एच.आय.व्ही.संसर्गित पुरुषाबरोबर असुरक्षित (कंडोम न वापरता) लैंगिक संबंध झाला आहे अशा तृतीयपंथीयाने, तिला पुरुष जोडीदारापासून एच.आय.व्ही. ची लागण होण्याची शक्यता कमी व्हावी यासाठी लैंगिक संबंधा नंतर ७२ तासाच्या आत ही औषधे (PEP) घ्यायला सुरु करायची असतात.
ड] कोणत्याही व्यक्तीचा एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीशी असुरक्षित लैंगिक संबंध (कंडॉम न वापरता) झाल्यास त्या व्यक्तीने, जोडीदारापासून एच.आय.व्ही. ची लागण होण्याची शक्यता कमी व्हावी यासाठी लैंगिक संबंधा नंतर ७२ तासाच्या आत ही औषधे (PEP) घ्यायला सुरु करायची असतात.

**४. (MRQ) एखाद्या व्यक्तीला खालील मार्गाने एच.आय.व्ही.ची लागण होऊ शकते-**
अ] एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीच्या ताटातील अन्न खाल्ल्याने.
ब] एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीसोबत खेळताना त्यानी ओरखडल्याने.
क] डास चावल्याने.
ड] वरील पैकी कोणतेही नाही.

**५. (SRQ) एच.आय.व्हीची लागण नसलेल्या व्यक्तीसोबत एखाद्या व्यक्तीने असुरक्षित (कंडोम न वापरता) लैंगिक संबंध केल्यास त्या व्यक्तीला एच.आय.व्ही. ची लागण होऊ शकते.**
अ] बरोबर.
ब] चूक.
क] सांगता येत नाही.

**६. (SRQ) ए.आर.टी. (अँटी रेट्रोव्हायरल थेरपी) ही औषधोपचार पध्दती शरीरातील एच.आय.व्ही.-**
अ] वर नियंत्रण ठेवते.
ब] पूर्णपणे नष्ट करते.

**७. (SRQ) एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीने ए.आर.टी. (अँटी रेट्रोव्हायरल थेरपी) औषधे किती काळ घ्यायला हवीत?**
अ] जो पर्यंत एच.आय.व्ही. चाचणी चा रिपोर्ट निगेटिव्ह येत नाही तोवर.
ब] दररोज न चुकता, ठरलेल्या वेळेवर घेणे, जोपर्यंत पांढऱ्या रक्तपेशींची संख्या (सीडी-४ संख्या) ५०० च्या खाली आहे.
क] आयुष्यभर, दररोज न चुकता, ठरलेल्या वेळेवर औषध घेणे.

**८. (SRQ) ज्या व्यक्तीला 'TB' (क्षयरोग) ची लागण झाली आहे त्या व्यक्तीची एच.आय.व्ही.ची ही चाचणी केली जाते कारण-**
अ] TBच्या जंतूमुळे एच.आय.व्ही. होतो.
ब] एच.आय.व्ही. संक्रमणामुळे TB होतो.
क] एच.आय.व्ही. ची लागण झाल्यामुळे प्रतिकार शक्ती कमी होते व त्या मुळे TB होण्याची शक्यता वाढते.

**९. (SRQ) ए.आर.टी. (अँटी रेट्रोव्हायरल थेरपी) औषधे रोज (नियमित) घेतली गेली नाहीत तर या औषधांना शरीराकडून प्रतिरोध केला जातो (म्हणजेच त्या औषधांचा काही उपयोग होत नाही).**
अ] बरोबर
ब] चूक

**१०. (SRQ) सरकारी ए.आर.टी. (अँटी रेट्रोव्हायरल थेरपी) केंद्रावर ए.आर.टी. औषधे मोफत मिळतात.**
अ] बरोबर
ब] चूक

**११. (SRQ) एखाद्या व्यक्तीला लिंगसांसर्गिक आजार (गुप्तरोग) झाला तर, त्या व्यक्तिमध्ये हमखास त्या आजाराची लक्षणे दिसतात.**
अ] बरोबर
ब] चूक

**१२. (MRQ) व्ही.डी.आर.एल. (VDRL-Veneral Disease Research Laboratory) तपासणी ही खालील लिंगसांसर्गिक (गुप्तरोग) आजारांच्या निदानासाठी केली जाते.**

| | | |
|---|---|---|
| अ] परमा (Gonorrhoea) | ब] क्लॅमिडीया | क] जेनायटल वार्टस |
| ड] हर्पिस (नागिण) | इ] गर्मी (Syphilis) | फ] उपदंश (Chancroid) |

**१३. (SRQ) एखाद्या सज्ञान पुरुषाने पुरुषवेश्येला कंडोम / निरोध पुरवणे-**
अ] फौजदारी दायित्व (Criminal Liability) आहे.
ब] दिवाणी दायित्व (Civil Liability) आहे.
क] फौजदारी व दिवाणी (Criminal and Civil Liability) दायित्व आहे.
ड] फौजदारी व दिवाणी (Criminal and Civil Liability) दायित्व नाही.

**१४. (MRQ) एच.आय.व्ही व एड्स (प्रतिरोध व नियंत्रण) अधिनियम, २०१७ नुसार एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीशी खालील क्षेत्रात भेदभाव करण्यास मज्जाव करण्यात आला आहे-**
अ] शिक्षण घेण्यास
ब] नोकरीच्या ठिकाणी
क] आरोग्य सेवा घेण्यास

## भाग अ: प्रभाग 3- सामाजिक मुद्दे

**१. (SRQ) मानसिक आरोग्य सेवा पुरवताना, लैंगिकतेवर आधारीत भेदभाव रोखण्यासाठी खालील कायद्यानुसार प्रतिबंध करण्यात आला आहे.**
अ] अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम (Rights of Persons with Disabilities Act), २०१६
ब] मानसिक आरोग्य अधिनियम (The Mental Healthcare Act), २०१७
क] तृतीयपंथी व्यक्ती (हक्क संरक्षण) अधिनियम (Transgender Persons (Protection of Rights) Act), २०१९

**२. (SRQ) तृतीयपंथी(पारलिंगी) व्यक्तीचा आर्थिक/ शाब्दिक / भावनिक/ लैंगिक/ शारीरिक छळ करणे हे खालील अधिनियमानुसार गुन्हा आहे.**
अ] अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम (Rights of Persons with Disabilities Act), २०१६
ब] मानसिक आरोग्य सेवा अधिनियम (The Mental Healthcare Act), २०१७.
क] तृतीयपंथी (हक्क संरक्षण) अधिनियम (The Transgender Persons (Protection of Rights) Act), २०१९.

**३. (SRQ) एखाद्या स्त्रीवर तिच्या समलिंगी स्त्री जोडीदाराकडून कौटुंबिक हिंसा होत असेल तर ती त्या विरोधात 'कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण अधिनियम' (The Protection of Women from Domestic Violence Act), २००५ अन्वये दाद मागू शकते.**
अ] बरोबर
ब] चूक

**४. (SRQ) तृतीयपंथीयांना ____% आरक्षण _______ या वर्गाअंतर्गत देण्यात आलेले आहे.**
अ] १% उभे आरक्षण (Vertical Reservation)
ब] १% समांतर आरक्षण (Horizontal Reservation)
क] २% उभे आरक्षण (Vertical Reservation)
ड] २% समांतर आरक्षण (Horizontal Reservation)
इ] ३% उभे आरक्षण (Vertical Reservation)
फ] ३% समांतर आरक्षण (Horizontal Reservation)
ग] यापैकी कोणतेही नाही.

**५. (MRQ) रहिवासी व उत्पन्नाचे काही निकष पूर्ण करणाऱ्या, खालील गटातील व्यक्तींना महाराष्ट्र राज्याची 'संजय गांधी निराधार योजना' लागू होते.**
अ] वेश्या व्यवसायातून मुक्त झालेल्या स्त्रिया
ब] तृतीयपंथी
क] एच.आय.व्ही./एड्स संसर्गित व्यक्ती
ड] वरील कोणतेही नाही

**६. (SRQ) तृतीयपंथी ओळखपत्र व प्रमाणपत्र मिळवण्यासाठी तृतीयपंथी व्यक्तीला 'जेंडर डिस्फोरिया' असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते.**
अ] बरोबर
ब] चूक

**७. (SRQ) तृतीयपंथी(पारलिंगी) व्यक्ती ज्या जिल्ह्यात रहात असेल त्या जिल्ह्याच्या ________ कडून तृतीयपंथी ओळखपत्र व प्रमाणपत्र वितरीत केले जाते.**

अ] आरोग्य विभागाकडून
ब] पोलीस आयुक्त/पोलिस अधीक्षक
क] जिल्हाधिकारी

**८. (SRQ) तृतीयपंथी प्रमाणपत्र व ओळखपत्र मिळवण्यासाठी केलेल्या अर्जात तृतीयपंथीनी त्यांच्या लिंगभावा(जेंडर) सोबत त्यांचं नावही बदलण्याचा पर्याय दिलेला असतो.**
अ] बरोबर
ब] चूक

**९. (SRQ) ज्या सज्ञान व्यक्तीचे शारीरिक लिंग स्त्री आहे (शरीर रचना स्त्री ची आहे) व स्वत:ची ओळख तृतीयपंथी असल्याचे सांगते, तिला तृतीयपंथी असल्याचे ओळखपत्र व प्रमाणपत्र मिळू शकते.**
अ] बरोबर
ब] चूक

**१०. (SRQ) तृतीयपंथींना मिळालेल्या तृतीयपंथी प्रमाणपत्राच्या आधारे, प्रमाणपत्रामध्ये दिलेल्या माहितीनुसार ते त्यांच्या आधारकार्डामध्ये पुढील बदल करू शकतात.**
अ] त्यांचे 'जेंडर' बदलणे
ब] त्यांचे 'जेंडर' व नाव बदलणे
क] त्यांचे 'जेंडर' किंवा नावात बदल करू शकत नाहीत.

**११. (SRQ) मानसोपचारतज्ञांनी 'जेंडर डिस्फोरिया' चे प्रमाणपत्र दिल्याशिवाय तृतीयपंथींना हार्मोन थेरपी किंवा लिंगबदल शस्त्रक्रिया करता येत नाही.**
अ] बरोबर
ब] चूक

**१२. (MRQ) तृतीयपंथी व्यक्ती (हक्क संरक्षण) अधिनियम (Transgender Persons (Protection of Rights) Act), २०१९, नुसार, तृतीयपंथी म्हणजे-**
अ] तृतीयपंथी व्यक्ती
ब] हिजडा समाजातील व्यक्ती
क] पुरुष
ड] ट्रान्सवुमन
इ] ट्रान्समॅन
फ] स्त्रिया
ग] द्विलिंगी व्यक्ती

## भाग अ: प्रभाग ४- कायदे

**१. (SRQ) 'जेंडर'च्या व्याख्येत 'तृतीयपंथीं'ना खालील पैकी कोणत्या दंड संहितेत समाविष्ट केलं आहे?**
अ] कलम ८- भारतीय दंड संहिता, १८६०
ब] कलम २(९)- प्रस्तावित आराखडा भारतीय न्याय संहिता, २०२३
क] भारतीय दंड संहिता १८६० व प्रस्तावित आराखडा भारतीय न्याय संहिता, २०२३, दोन्हींमध्ये.
ड] भारतीय दंड संहिता १८६० व प्रस्तावित आराखडा भारतीय न्याय संहिता, २०२३ यापैकी कश्यातच नाही.

**२. (SRQ) जेव्हा एखादा गुन्हा दखलपात्र (Cognizable) असतो तेव्हा एफ.आय.आर. (FIR) (प्राथमिक माहिती अहवाल) नोंदवला जातो.**
अ] बरोबर
ब] चूक

**३. (SRQ) एखादा गुन्हा, भारतीय दंड संहिता, १८६० अंतर्गत शेड्युल १ मध्ये जामीनपात्र गुन्हा (Bailable Offence) म्हणून सूचीबध्द केला असेल तर त्याचा अर्थ-**
अ] आरोपीला १४ दिवसांच्या पोलीस कोठडी नंतर जामीन मिळू शकतो.
ब] आरोपीला १ दिवसाच्या पोलीस कोठडी नंतर जामीन मिळू शकतो.
क] आरोपीला पोलिस ठाणे/न्यायालयामधून तातकाळ जामीन मिळू शकतो.

**४. (SRQ) तडजोडीयोग्य गुन्हा (Compoundable Offence) असेल तर तो न्यायालयाच्या सहमती शिवाय अपराधी आणि पीडीत यांच्या मध्ये परस्पर सहमतीने मिटवता येतो.**
अ] बरोबर
ब] चूक

**५. (SRQ) फौजदारी प्रक्रिया संहितांचे कलम २०० अन्वये, पोलिसांकडे न जाता थेट प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्याकडे गुन्ह्याची तक्रार नोंदवता येऊ शकते.**
अ] बरोबर
ब] चूक

**६. (MRQ) गुन्ह्याला बळी पडलेल्या एलजीबीटीआयक्यू समुदायातील व्यक्तीला पोलिसांनी भेदभावाची/असंवेदनशीलतेची वागणूक दिली तर-**
अ] गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तीचा पोलीस खात्यावरचा विश्वास उडतो.
ब] गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तीचा आत्मविश्वास खचतो.
क] गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तीवर अन्याय होणे चालू राहते.
ड] गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तीच्या आत्मसन्मानाचे खच्चीकरण होते.
इ] गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तिला नैराश्य येऊन आत्महत्येशिवाय पर्याय नाही असे वाटू शकते.
फ] सर्व पोलीस असंवेदनशील असतात असा समज बनतो.

**७. (SRQ) परस्पर संमतीने दोन सज्ञान समलिंगी पुरुषांनी, खाजगीत, एकमेकांबरोबर संभोग करणे-**
अ] बेकायदेशीर आहे
ब] बेकायदेशीर नाही

**८. (SRQ) तृतीयपंथी व्यक्ती (हक्क संरक्षण) विधेयक, २०१९, कलम १८ अंतर्गत तृतीयपंथी व्यक्तींविरुध्द घडलेले गुन्हे-**
अ] दखलपात्र आहेत.
ब] अदखलपात्र आहेत.

**९. (MRQ) राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरण (NALSA: National Legal Services Authority) वि. युनियन ऑफ इंडीया या खटल्याचा सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला त्यात खालील ठळक बाबींचा समावेश आहे-**
अ] या निकालाद्वारे तृतीयपंथी लोकांना 'थर्ड जेंडर' (Third Gender) म्हणून कायदेशीर मान्यता दिली.
ब] तृतीयपंथियांचा सामाजिक, आर्थिक मागास घटकात समावेश करून त्यांना शिक्षण आणि नोकरी मध्ये आरक्षण देण्यात यावे.
क] शासनाला सुचीत करण्यात आले की त्यांनी तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र एच.आय.व्ही. चाचणी/उपचार केंद्रे सुरु करावीत.
ड] तृतीयपंथीयांवर होणाऱ्या भेदभावाला प्रतिबंधित करण्यात आले.

**१०. (MRQ) भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३७७ ला आव्हान देणाऱ्या, [नवतेजसिंग जोहर वि. युनियन ऑफ इंडीया] या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठामध्ये पुढील मान्यवर न्यायमूर्तींचा समावेश होता.**
अ) न्या. दिपक मिश्रा    ब] न्या. धनंजय चंद्रचूड    क] न्या. आर. एफ. नरिमन
ड] न्या. ए. के. सिक्री    इ] न्या. के. एस. राधाकृष्णन    फ] न्या. ए. एस. खानविलकर
ग] न्या. इंदू मल्होत्रा

**११. (SRQ) ज्या व्यक्तीची कायदेशीर ओळख तृतीयपंथी आहे अशी व्यक्ती तृतीयपंथी श्रेणीत पोलीस सेवा भरतीसाठी अर्ज करू शकते.**
अ] बरोबर
ब] चूक

**१२. (SRQ) भारतीय दंड संहिता, १८६०, च्या कलम ३५४-ड अंतर्गत, खालील पैकी कोणाचा पाठलाग करणे (Stalking) गुन्हा आहे?**
अ] पुरुष
ब] स्त्री
क] स्त्री व पुरुष

**१३. (SRQ) एखाद्या व्यक्तीला तिच्या मर्जीविरुद्ध कोणी डांबून ठेवले असल्यास तिला शोधण्यासाठी शोध वॉरंट जारी करण्याचे अधिकार प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांना, फौजदारी प्रक्रिया संहिता (Criminal Procedure Code), १९७९ च्या कोणत्या कलमान्वये दिले आहेत?**
अ] ३२
ब] ९७
क] २२६
ड] ९३

**१४. (SRQ) २०१५ साली सर्वोच्च न्यायालयाने, माहिती आणि तंत्रज्ञान अधिनियम (Information and Technology Act), २००० चे कलम ६६अ _____ म्हणून घोषीत केले.**
अ] संविधानिक
ब] अंशत: संविधानिक
क] असंविधानिक

**१५. (SRQ) भारतामध्ये, १८ वर्ष पूर्ण झालेल्या दोन समलिंगी व्यक्तींनी 'लिव्ह-इन रिलेशनशिप'मध्ये स्वखुशीने राहणं हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे.**
अ] बरोबर
ब] चूक

**१६. (SRQ) जर एखादी सज्ञान समलिंगी स्त्री तिच्या मर्जीने, तिच्या सज्ञान समलिंगी स्त्री जोडीदाराच्या घरी 'लिव्ह-इन रिलेशनशिप' मध्ये राहत असेल आणि या मुळे, तिच्या घरचे तिला / तिच्या जोडीदाराला त्रास देत असतील / धमकावत असतील / तिच्या जोडीदाराला सोडून देण्यासाठी दबाव आणत असतील तर ती स्त्री न्यायालयात जाऊन तिच्या घरचांच्या विरोधात कोणत्या कलमान्वये प्रतिबंधात्मक आदेश मिळवू शकते?**
अ] मानसिक आरोग्य अधिनियम (The Mental Healthcare Act), २०१७.
ब] स्त्रियांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम (The Protection of Women from Domestic Violence Act), २००५.
क] विशिष्ट मदत अधिनियम (Special Relief Act), १९२१.

**१७. (MRQ) समलिंगी विवाहाला खालील देशांमध्ये मान्यता आहे.**

| | | |
|---|---|---|
| अ] फ्रान्स | ब] उरुग्वे | क] पाकिस्तान |
| ड] ब्राझील | इ] मेक्सिको | फ] तैवान |

**१८. भारतात, विवाह करणे हा व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे.**
अ] बरोबर
ब] चूक

**१९. (MRQ) भारतात, खालील जोडप्यांना, विशेष विवाह अधिनियम, १९५४ अंतर्गत, विवाह करता येतो.**

| | | |
|---|---|---|
| अ] पुरुष व स्त्री | ब] पुरुष व तृतीयपंथी | क] ट्रान्समन व तृतीयपंथी |
| ड] ट्रान्समन व स्त्री | इ] पुरुष व पुरुष | फ] स्त्री व स्त्री |

# भाग ब: उत्तरसंच व टिपा

## भाग अ: प्रभाग १- प्राथमिक माहिती

### १. (ब) लिंग, लिंगभाव आणि लैंगिक कल

प्रत्येक व्यक्तीचे शारीरिक लिंग, लिंगभाव आणि लैंगिक कल असे तीन स्वतंत्र पैलू असतात. या तीन पैलूंबद्दल सोप्या भाषेत स्पष्टीकरण खाली दिले आहे.

**(अ) शारीरिक लिंग**

प्रामुख्याने मानवामध्ये दोन प्रकारच्या शरीर रचना आढळून येतात- पुरुष शरीर रचना व स्त्री शरीर रचना. क्वचित वेळा काही बाळं अशी जन्माला येतात की ज्यांना मुलगी व मुलाचे असे दोघांचेही काही अंशी विकसित प्रजनन अवयव असतात. अशी संदिग्ध शरीररचना असलेल्या व्यक्तींना द्विलिंगी म्हणतात (Intersex).

१०,००० व्यक्तिंमधील अंदाजे दोनापेक्षा कमी व्यक्तिंमध्ये द्विलिंगी रचना आढळते.

**(ब) लिंगभाव**

व्यक्तीचे शारीरिक लिंग कोणतेही असले तरी ती व्यक्ती स्वतःला स्त्री की पुरुष मानते/समजते, स्त्री म्हणून का पुरुष म्हणून जग अनुभवते तो त्या व्यक्तीचा लिंगभाव (Gender Identity) असतो. बहुतांशी व्यक्तींचे जे शारीरिक लिंग असते तोच त्यांचा लिंगभाव असतो. म्हणजे शरीराने पुरुष व लिंगभाव पुरुषाचा आणि शरीराने स्त्री व लिंगभाव स्त्री चा. म्हणजेच या दोन्हींमध्ये- शरीर रचना व लिंगभाव यात संलग्नता असते. पण काही व्यक्तींमध्ये शारीरिक लिंग एक असतं पण लिंगभाव वेगळा असतो.

काही व्यक्ती शरीराने पुरुष असतात पण लिंगभाव स्त्री चा असतो. शरीराने पुरुष असलेल्या ११,००० व्यक्तींमध्ये अंदाजे १ जण अशी असते जिचा लिंगभाव स्त्री चा असतो. अशा काही व्यक्ती स्वतःची ओळख तृतीयपंथी (पारलिंगी) म्हणून सांगतात तर काही जणी स्वतःची ओळख 'ट्रान्सवूमन' म्हणून सांगणं पसंत करतात. अशा व्यक्तींना स्त्रीची जीवनशैली जगायची तीव्र इच्छा असते.

तसेच, काही व्यक्ती शरीराने स्त्री असतात पण लिंगभाव पुरुषाचा असतो. अशांना 'ट्रान्समॅन' म्हणतात. शरीराने स्त्री असलेल्या ३०,००० व्यक्तींमध्ये अंदाजे १ व्यक्ती अशी असते जिचा लिंगभाव पुरुषाचा असतो. अशा व्यक्तींना पुरुषाची जीवनशैली जगायची तीव्र इच्छा असते.

काही व्यक्ती 'पॅनजेंडर' असतात. अशा व्यक्ती स्त्री व पुरुष असे दोन्ही लिंगभाव एकत्रितपणे अनुभवतात.

काही व्यक्ती 'अजेंडर' असतात. अशा व्यक्ती ना स्त्री लिंगभाव अनुभवतात, ना पुरुष लिंगभाव अनुभवतात.

**(क) लैंगिक कल**

एखादी व्यक्ती वयात आल्यावर तिच्या पौगंडावस्थेत तिला स्त्री विषयी की पुरुषा विषयी की दोघां विषयी भावनिक आणि लैंगिक आकर्षण वाटते की कोणाही विषयी भावनिक आणि लैंगिक आकर्षण वाटत नाही हा त्या व्यक्तीचा लैंगिक कल असतो.

बहुतांश स्त्री आणि पुरुषांचा भिन्नलिंगी लैंगिक कल (Heterosexual) असतो. म्हणजे स्त्रिया भावनिक आणि लैंगिकदृष्ट्या फक्त पुरुषांकडे आकर्षित होतात आणि पुरुष भावनिक आणि लैंगिकदृष्ट्या फक्त स्त्रियांकडे आकर्षित होतात.

काही व्यक्ती उभयलिंगी लैंगिक कलाच्या असतात (Bisexual) म्हणजे त्यांना स्त्री व पुरुष या दोघांविषयी भावनिक, लैंगिक आकर्षण असते.

काही व्यक्ती समलिंगी लैंगिक कलाच्या असतात (Homosexual/Gay). (म्हणजे पुरुषाला फक्त पुरुषांबद्दलच भावनिक, लैंगिक आकर्षण असते व स्त्री ला फक्त स्त्रियांबद्दलच भावनिक, लैंगिक आकर्षण असते).

लोकसंख्येतील एकूण पुरुषांपैकी साधारणपणे ३% पुरुष समलिंगी असतात. तर लोकसंख्येतील एकूण स्त्रियांपैकी साधारणपणे १% स्त्रिया समलिंगी असतात.

काही व्यक्ती अलैंगिक (Asexual) असतात. म्हणजे त्यांना कोणाही विषयी लैंगिक आकर्षण वाटत नाही.

निसर्गात आपल्याला, शारीरिक लिंग, लिंगभाव, लैंगिक कल यांची असंख्य छटांची गुंफण दिसून येते. या पैकी प्रामुख्याने दिसून येणारी दोन प्रकारची गुंफण म्हणजे-

अ) शरीर रचना– पुरुष, लिंगभाव- पुरुषाचा, लैंगिक कल– फक्त स्त्रियांविषयी भावनिक आणि लैंगिक आकर्षण.

ब) शरीर रचना– स्त्री, लिंगभाव– स्त्रीचा, लैंगिक कल– फक्त पुरुषांविषयी भावनिक आणि लैंगिक आकर्षण.

जरी बहुसंख्य व्यक्तींमध्ये वरील दोन प्रकारची गुंफण आढळत असली तरी इतर वैविध्येही निसर्गात आढळतात व ती वैविध्ये अनैसर्गिक नाहीत.

उदा. १. शरीर रचना- पुरुष, लिंगभाव- पुरुषाचा, लैंगिक कल- पुरुषांविषयी भावनिक आणि लैंगिक आकर्षण.

उदा. २. शरीर रचना- स्त्री, लिंगभाव- पुरुषाचा, लैंगिक कल- स्त्रियांविषयी भावनिक आणि लैंगिक आकर्षण.

उदा. ३. शरीर रचना- द्विलिंगी, लिंगभाव- स्त्री चा, लैंगिक कल- स्त्रियांविषयी भावनिक आणि लैंगिक आकर्षण.

**महत्वाचे:**

- शारीरिक लिंग, लिंगभाव व लैंगिक कल हे स्वतंत्र पैलू आहेत, त्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही.
- सर्व प्रकारचे लिंगभाव, लैंगिक कल मग ते बहुसंख्य असोत वा अल्पसंख्य, ही सर्व मानवाच्या लैंगिकतेची नैसर्गिक रुपे आहेत आणि ती कोणत्याही औषधोपचारांनी बदलता येत नाहीत.
- व्यक्ती चे शारीरिक लिंग, लिंगभाव व लैंगिकता कोणतीही असोत, त्या व्यक्तीला स्विकारणे व समानतेची वागणूक देणे हे आपल्या सर्वांच्या हिताचे आहे.

*(वरील माहिती, 'Basics of Sex, Gender and Sexuality' (लेखक - डॉ. भूषण शुक्ल, बिंदुमाधव खिरे, २०२१) या पुस्तकातील माहितीवरून, संपादीत स्वरुपात दिली आहे.)*

**२. (ब) चूक**
ज्या व्यक्तीला स्त्री व पुरुष या दोघांचेही काही अंशी विकसित प्रजनन अवयव आहेत अशा व्यक्तीला द्विलिंगी म्हणतात.

**३. (क) समलिंगी पुरुष ओळखणे**
व्यक्तीच्या दिसण्यावरून, बाह्यरुपावरून ती व्यक्ती समलिंगी असल्याचे समजू शकत नाही. व्यक्ती समलिंगी आहे का? हे तपासण्यासाठी कोणतीही वैद्यकीय चाचणी उपलब्ध नाही. समलिंगी असणे हे समाजाकडून कलंकीत मानले जाते त्यामुळे सामाजिक दडपणाखाली अनेक समलिंगी पुरुष स्त्रियांशी लग्न करतात आणि त्या पैकी काहींना मुले होतात. पुरुषी दिसणे / बोलणे / वागणे किंवा तो पुरुष विवाहित आहे, त्याला मुलबाळ आहे या निकषांवरुन त्या पुरुषाच्या लैंगिक कलाचं निदान करता येत नाही.

**४. (अ, ब, क) ग्रंथांमध्ये समलिंगी संभोगाचे संदर्भ**
'नारद स्मृती', 'मनुस्मृती', 'कामसूत्र' या तीनही ग्रंथामध्ये समलिंगी संभोगाचे संदर्भ आढळतात. विदेशी आक्रमणकर्त्यांमुळे भारतात समलैंगिकता आली हे म्हणणे चुकीचे आहे. ती प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात होती.

**५. (क) एखादा पुरुष समलिंगी आहे म्हणजे-**
समलिंगी पुरुषाची शरीरचना पुरूषाची असते व ती व्यक्ती पुरुषाकडेच भावनिक व लैंगिकदृष्ट्या आकर्षित होते. काही समलिंगी पुरुष, दुसऱ्या पुरुषासोबत लैंगिक संबंध करताना स्वीकृत भूमिका घेतात; काही पुरुष दुसऱ्या पुरूषांशी लैंगिक संबंध करताना गमनी भूमिका घेतात व काही समलिंगी पुरुष दोन्ही प्रकारच्या लैंगिक भूमिका घेतात.
ज्या व्यक्तीला लैंगिक संबंध करण्यासाठी लिंगाला ताठरता येत नाही अशा व्यक्तीला नपुंसक म्हणतात.
वरील माहितीवरून दिसून येते की समलिंगी असणे व नपुंसक असणे या दोन वेगवेगळ्या संज्ञा आहेत आणि या दोन्हींचा एकमेकांशी काहीही संबंध नाही.

**६. (अ, ब, क) निसर्गात आढळणारी समलैंगिकता**
समलैंगिकता हे लैंगिकतेचे एक नैसर्गिक रुप आहे व ती काही माणसांमध्ये, प्राण्यांमध्ये आणि पक्ष्यांमध्ये दिसून येते.

**७. (ब) लैंगिक आकर्षण (Sexual Attraction) आणि लैंगिक इच्छा (Sexual Desire)**
लैंगिक आकर्षण आणि लैंगिक इच्छा या वेगवेगळ्या गोष्टी आहेत.
लैंगिक आकर्षण ही व्यक्तीची भावनिक स्थिती असते. या आकर्षणामुळे लैंगिक विषयामध्ये रस निर्माण होतो.
लैंगिक आकर्षण वाटू लागले कि लैंगिक इच्छा उत्पन्न होते. म्हणजे लैंगिक इच्छा होण्या आधी लैंगिक आकर्षण वाटणे गरजेचे आहे.
जर लैंगिक आकर्षणचं नसेल तर लैंगिक इच्छा उत्पन्न होणार नाही.

**८. (ड) अलैंगिकता**
अलैंगिकता म्हणजे लैंगिक आकर्षणाचा अभाव असणे. अलैंगिक व्यक्तीला कोणाही विषयी लैंगिक आकर्षण जाणवत नाही. लैंगिक आकर्षण जाणवत नाही म्हणून तिला लैंगिक इच्छा होत नाही. (महत्वाची गोष्ट- जर एखाद्या व्यक्तीला लैंगिक इच्छा होत नसेल तर याचा अर्थ ती व्यक्ती अलैंगिक आहे असा होत नाही. त्या व्यक्तीला लैंगिक इच्छा न होण्याची इतरही कारणे असू शकतात. आणि या कारणांचं निराकरण शारीरिक आणि मानसिक आरोग्यतज्ञांकडून केले जाऊ शकते.)

**९. (क) एलजीबीटीआयक्यू मधील 'क्यू' अक्षर**
एलजीबीटीआयक्यू मधील 'क्यू' म्हणजे 'क्विअर' शब्द विविध अर्थाने वापरला जातो.
(i) अशी व्यक्ती जी स्वत:चा लिंग/लिंगभाव/लैंगिकता याविषयी गोंधळलेली आहे/साशंक आहे.
(ii) शारीरिक लिंग, लिंगभाव व लैंगिकता या बाबतीत अल्पसंख्य असणाऱ्या विविधतांना सामावून घेण्यासाठी सर्वसमावेशक शब्द म्हणूनही 'क्विअर' शब्दाचा वापर होतो. उदा. 'अद्वैत पुणे आंतरराष्ट्रीय एलजीबीटीआयक्यू चित्रपट महोत्सव' ऐवजी 'अद्वैत पुणे आंतरराष्ट्रीय क्विअर चित्रपट महोत्सव' असे संबोधणे सोयीचे ठरते.
'क्विअर' शब्द कोणत्या संदर्भात वापरला आहे त्यानुसार त्याचा अर्थ लावावा.

**१०. (क) नपुंसक**
नपुंसक असणे म्हणजे पुरुषाला संभोग करण्यासाठी लिंगाला ताठरता न येणे.
नपुंसकत्वाची विविध कारणे असू शकतात- शारीरिक, मानसिक किंवा काही औषधांचे दुष्परिणाम.
अनेक वेळा नपुंसकत्व हे थोड्या काळापुरते दिसते. उदा. जेव्हा पुरुष दमलेला असेल, तणावा खाली असेल, आजारपणातून नुकताच बरा झालेला असेल किंवा काही विशिष्ट औषधे घेत असल्यास त्याचा परीणाम म्हणून पुरुषाला तात्पुरते नपुंसकत्व येऊ शकते.

**११. (अ-४, ब-७, क-२, ड- १, इ-६, फ-३, ग-५) जोड्या**
- तुमचा लैंगिक कल म्हणजे तुम्ही लैंगिकदृष्ट्या कोणाकडे आकर्षित होता- स्त्रिया / पुरुष / स्त्रिया व पुरुष / कोणाही कडे नाही.
- पुरुषाचे वीर्यपतन होताना त्या स्रावात प्रामुख्याने दोन महत्वाच्या घटकांचा समावेश असतो- पुरुषबीजे (शुक्राणू) आणि वीर्य. पुरुषबीजे वृषणात तयार होतात. तर वीर्य हे दोन वीर्यकोषात तयार होते. वीर्यकोष पुर:स्थ ग्रंथीच्या बाजूला असतात.
- तुमचा लिंगभाव म्हणजे तुम्ही जग स्त्री चा नजरेतून का पुरुषाच्या नजरेतून अनुभवता (तुम्ही स्वतःला स्त्री का पुरुष मानता).

- ज्या व्यक्तीला स्त्री व पुरुष या दोंघांचे काही प्रमाणात विकसित प्रजनन अवयव आहेत अशा व्यक्तीला द्वीलिंगी म्हणतात.
- गर्भाशय मुख (Cervix)- हा स्त्री शरीराचा भाग आहे. गर्भाशय मुख हे योनीमार्गाच्या शेवटी असते व तिथून गर्भाशयाची सुरुवात होते.
- पुर:स्थ ग्रंथी (Prostate Gland)- हा पुरुष शरीररचनेतील भाग आहे. मुत्राशयाच्या खालचा बाजूला जोडलेली ही ग्रंथी आहे. स्त्रियांच्या शरीरात हा भाग नसतो.

**१२. (अ, ब, क, ड) निसर्गात आढळणारी विविधता**
शारीरिक लिंग, लिंगभाव आणि लैंगिक आकर्षण यांची सर्व प्रकारची मिश्रणे निसर्गात आढळून येतात.

## भाग अ: प्रभाग २(अ)- मानसिक आरोग्य

**१. (इ) वैद्यकिय वर्गीकरण**
समलैंगिकता ही कोणत्याही वैद्यकिय वर्गीकरणांतर्गत विकार किंवा आजार मानला जात नाही. हे लैंगिकतेचं नैसर्गिक रूप आहे.

**२. (ब) 'जेंडर डिस्फोरिया'**
ज्या व्यक्तीचा लिंगभाव तिच्या शारीरिक लिंगापेक्षा वेगळा असतो अशा स्थितीला वैद्यकिय भाषेत 'जेंडर डिस्फोरिया' असे म्हणले जाते. अशा व्यक्तींची तीव्र इच्छा असते की त्यांना त्यांच्या लिंगभावानुसार जीवनशैली जगायाला मिळावी. काही जण संप्रेरक घेऊन / शस्त्रक्रियेद्वारे त्यांच्या लिंगभावानुसार शरीरात बदल करून घेतात.
उदा. १: पुरुषाचे शरीर असणारे काही तृतीयपंथी स्त्रीचे संप्रेरक घेतात तसेच शस्त्रक्रिया करून पुरुषाची जननेंद्रीये काढून त्याजागी स्त्री जननेंद्रीयांची रचना करून घेतात. अशा शस्त्रक्रियांना लिंगबदल शस्त्रक्रिया (जेंडर अफरमेटीव्ह सर्जरी) असे म्हणतात.
उदा. २: काही ट्रान्समन पुरुषाची संप्रेरके घेतात तसेच शस्त्रक्रिया करून स्तन कमी करतात. अशा शस्त्रक्रियांना लिंगबदल शस्त्रक्रिया (जेंडर अफरमेटीव्ह सर्जरी) असे म्हणतात.

**३. (क) 'कन्व्हर्जन थेरपी'**
व्यक्तीचा लैंगिक कल बदलून त्या व्यक्तीला भिन्नलिंगी बनवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना / उपचारपध्दतींना / व्यक्तीचा लिंगभाव बदलण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना / उपचारपध्दतींना 'कन्व्हर्जन थेरपी' म्हणतात. अशा प्रयत्नांना, भारतीय वैद्यकिय परिषद, व्यावसायिक आचरण, शिष्टाचार आणि नैतिक नियम (Indian Medical Council Professional Conduct, Ethics and Etiquettes, Regulations), २००२ नुसार अनैतिक आणि व्यावसायिक गैरवर्तन ठरवण्यात आलेले आहे. अशा कोणत्याही प्रयत्नाने लैंगिक कल किंवा लिंगभाव बदलता येत नाही. उलट अशा प्रयत्नांनी त्या व्यक्तीची अस्मिता अजूनच खालावते, नैराश्य वाढतं. अशा उपचारांमुळे काही जण आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात.

**४. (अ, ब, क, ड) असंवेदनशीलता/भेदभावाचे परिणाम**
एलजीबीटीआयक्यू व्यक्तींना डॉक्टरांनी असंवेदनशीलतेची / भेदभावाची वागणूक दिली तर त्याचे अनेक व दीर्घकाळ टिकणारे परिणाम त्या व्यक्तीला भोगावे लागतात. ती व्यक्ती ज्या आजार / रोगाच्या उपचारासाठी आली आहे ते उपचार ती अर्धवट सोडून देते व त्या मुळे आजार/रोग असेल तो आणखीन बळावतो, किंवा मग नाईलाजाने ती व्यक्ती दुसऱ्या डोक्टरांकडे उपचार घ्यायला जाते. यामध्ये तिचा वेळ आणि पैसा खर्च होतो आणि उपचार व्हायला विलंब होतो. आत्मविश्वास खचतो, आणि मानसिक ताण वाढतो. काही जण भोंदू वैद्य, बोगस डॉक्टर यांच्याकडून उपचार घेण्यासाठी जातात. या मध्ये त्या व्यक्तीचे आर्थिक शोषण होते आणि योग्य उपचारही मिळत नाहीत.
या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून रुग्णाचा असा समज होतो की, सर्वच डॉक्टर हे एलजीबीटीआयक्यू सदस्यांचा तिरस्कार करणारे आहेत. एकमेकांशी बोलण्यातून हा समज सर्वत्र पसरतो आणि अशा डॉक्टर / दवाखाना / इस्पितळाचं नाव बदनाम होतं.

**५. (अ, क) मानसशास्त्रीय मूल्यांकन**
- बहुतेक लोकांना लिंगभाव आणि लैंगिक कल यातील फरक माहित नसतो. उदा. काही पुरुषांना जर दुसऱ्या पुरुषांविषयी लैंगिक आकर्षण वाटत असेल तर त्यांचा गैरसमज होतो की ते तृतीयपंथी असले पाहिजेत. त्यांना 'लैंगिक आकर्षण' आणि 'स्वतःचा लिंगभाव' या मध्ये फरक आहे हे माहित नसते. म्हणून त्यांची या विषयाची समज व त्यांचे अनुभव नीट पडताळून, समजून घेणे आवश्यक असते.
- काही वेळेस 'सायकोसिस', 'स्कीझोफ्रेनिया' या सारख्या मानसिक आजारांमध्येही 'जेंडर डिस्फोरिया' सारखी लक्षणे दिसू शकतात. (उदा, जर एखाद्या पुरुषाला आवाज ऐकू येत असेल की 'त्यानी साडी नेसली पाहिजे' तर अशा वेळी त्याचे वर्तन त्याच्या मानसिक आजारामुळे आहे की त्याच्या लिंगभावानुसार आहे- हे केवळ मानसशास्त्रीय विश्लेषणातूनच स्पष्ट होते.)
- 'जेंडर डिस्फोरिया' हा आजार किंवा विकृती नाही. त्यामुळे तो बरा करण्याचा प्रश्नच येत नाही.

**६. (ग) 'जेंडर डिस्फोरिया'चे निदान करण्यासाठी खालील बाबींविषयी माहिती घेणे आवश्यक असते**
त्या व्यक्तीचे बालपण, तिचा लिंगभाव, तिचा लैंगिक इतिहास, तिला आलेले लिंगभावासंदर्भातील अनुभव, तिला आलेले लैंगिक अनुभव इ. बाबींविषयी माहिती घेणे आवश्यक असते. त्या व्यक्तीची स्वत:विषयीची समज काय आहे हे पण जाणून घेतले जाते. त्या

व्यक्तीचे शारीरिक लिंग, लिंगभाव व लैंगिकता या विषयी काय समज आहे हे जाणून घेतल्यावर या बाबत काही गैरसमज असतील तर त्यांचे निराकरण केले जाते.
याच सोबत त्या व्यक्तीला लहानपणापासून ओळखणाऱ्या कुटुंबातील सदस्याची किंवा एखाद्या शेजाऱ्याची मुलाखत घेऊन त्यांच्याकडून व्यक्तीविषयी अधिक जाणून घेता येते. त्या नातलग/शेजाऱ्याने दिलेली माहिती आणि तिला ओळखणाऱ्या व्यक्तीकडून मिळालेली माहिती पडताळून पाहता येते.

**७. (ब) 'जेंडर डिस्फोरिया' प्रमाणपत्रांची संख्या**
'जेंडर डिस्फोरिया'चे निदान करण्यासाठी, त्या व्यक्तीची दीर्घ मुलाखत घेतली जाते. याचबरोबर काही मानसशास्त्रीय चाचण्या करून काही मानसिक आजारामुळे 'जेंडर डिस्फोरिया'ची लक्षणं दिसत नाहीत ना, हे पडताळून पहिले जाते. मुलाखती आणि मानसशास्त्रीय चाचण्यांचे अहवाल/निकाल यांचे विश्लेषण केले जाते आणि त्या नंतर दोन मानसोपचारतज्ज्ञांकडून संबंधित व्यक्तीला 'जेंडर डिस्फोरिया' असल्याची दोन प्रमाणपत्रे मिळतात (प्रत्येकाकडून एक). काही अपवाद वगळता, संप्रेरक घेण्यासाठी /लिंग बदल शस्त्रक्रिया करण्यासाठी दोन प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक असते.

**८. (अ) लिंग बदल शस्त्रक्रिया ('जेंडर अफर्मेटिव्ह सर्जरी')**
वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या कोणत्याही स्वयंघोषीत तृतीयपंथी / ट्रान्सवुमन / ट्रान्समन ला, दोन 'जेंडर डिस्फोरिया'ची प्रमाणपत्रे मिळवून, स्वेच्छेने, संप्रेरके घेता येतात, आपली जननेंद्रीये शस्त्रक्रियेद्वारे काढून टाकता येतात व आपल्या लिंगभावानुसार नवीन जननेंद्रिये घडवता येतात. अशी शस्त्रक्रिया करून घेण्याला कायद्याची कोणतीही आडकाठी नाही.

## भाग अ: प्रभाग २(ब)- शारीरिक आरोग्य

**१. (क) एच.आय.व्ही. ची तपासणी**
जेव्हा एखाद्या व्यक्तीला एच.आय.व्ही. ची लागण होते, तेव्हा एच.आय.व्ही. विषाणूशी लढण्यासाठी शरीरात प्रतिपिंडे (अँटीबॉडीज) तयार होण्यास काही आठवडे लागतात. या कालावधीला 'विंडो पिरियड' म्हणतात.
एच.आय.व्ही.ची लागण झाली आहे की नाही हे तपासण्याच्या विविध चाचण्या आहेत. या पैकी सामान्यतः केल्या जाणाऱ्या चाचणीमध्ये शरीरात एच.आय.व्ही. प्रतिपिंडे तयार झाली आहेत का हे तपासले जाते. प्रतिपिंडे तयार होण्यास काही आठवड्यांचा कालावधी लागतो म्हणून शेवटच्या असुरक्षित (कंडोम न वापरता केलेल्या) लैंगिक संबंधानंतर ९० दिवसांनी एच.आय.व्ही.ची तपासणी करण्याचा सल्ला डॉक्टर देतात.

**२. (अ, क) 'प्री एक्सपोजर प्रोफिलॅक्सीस' (PrEP)**
ज्या पुरुषाचे अनेक व्यक्तींशी लैंगिक संबंध आहेत अशा पुरुषाला एच.आय.व्हीची लागण होण्याचा धोका कमी व्हावा, या करीता डॉक्टर दररोज, 'PrEP' औषधं घेण्याचा सल्ला देतात. या औषधांसोबतच, लैंगिकसंबंधा दरम्यान नेहमी कंडोमचा वापर करणे आवश्यक असते. 'PrEP' औषधे ही कंडोम वापरण्यास पर्याय नाहीत.
ज्या स्त्रीचे अनेक पुरुषांशी लैंगिक संबंध आहेत अशा स्त्रीनेही 'PrEP' औषधे घेऊन एच.आय.व्ही.ची लागण होण्याचा धोका कमी करण्याचा सल्ला डॉक्टर देतात, आणि तिच्या पुरुष जोडीदारांनी लैंगिकसंबंधा दरम्यान नेहमी कंडोमचा वापरही करायचा असतो. 'PrEP' औषधे ही कंडोम वापरण्यास पर्याय नाहीत.

**३. (ड) 'पोस्ट एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस' (PEP)**
ज्या व्यक्तीचा एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीशी असुरक्षित (कंडोम न वापरता) लैंगिक संबंध झाला आहे अशा व्यक्तीने असुरक्षित लैंगिक संबंधानंतर ७२ तासाच्या आत, ही औषधे (PEP) चालू करावीत. ही औषधे, एक महिना, दररोज घ्यावी लागतात. या औषधांमुळे त्या व्यक्तीला एच.आय.व्ही. होण्याची शक्यता कमी होते. ही औषधे लगेच म्हणजे असुरक्षित लैंगिक संबंधानंतर २४ तासाच्या आत घेण्यास सुरु केल्यास औषधे जास्त परिणामकारक ठरतात. असुरक्षित लैंगिक संबंधानंतर २४ ते ४८ तासांच्या आत 'PEP' औषधे घेणे सुरु केल्यास त्यांची परिणामकारकता कमी होते. ४८ ते ७२ तासांदरम्यान 'PEP' औषधे घेणे सुरु केल्यास या औषधांचा प्रभाव अधिक मंदावतो. ७२ तासानंतर 'PEP' औषधे घेणे सुरु केल्यास त्याचा काहीही उपयोग होत नाही.

**४. (ड) एच.आय.व्ही.ची लागण**
एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीच्या ताटातील अन्न खाण्याने, त्या व्यक्तीसोबत खेळताना त्यानी ओरखडल्याने, किंवा एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीला चावलेला डास दुसऱ्या व्यक्तीला चावल्यामुळे या पैकी कोणत्याही मार्गाने एच.आय.व्ही.ची लागण होत नाही.

**५. (ब) एच.आय.व्ही. संक्रमण**
एखाद्या व्यक्तीने एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीशी असुरक्षित (कंडोम न वापरता) लैंगिक संबंध केल्यास त्या व्यक्तीला एच.आय.व्ही.ची लागण होऊ शकते. एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीच्या वीर्यात / योनीस्त्रावात / रक्तात एच.आय.व्हीचे विषाणू असतात. एच.आय.व्ही. संसर्ग नसलेल्या व्यक्तीशी कंडोम न वापरता लैंगिक संबंध केल्यास तिच्या कडून दुसऱ्या व्यक्तीला एच.आय.व्ही.ची लागण होण्याचा प्रश्नच येत नाही. पण एखाद्या व्यक्तीच्या रुपावरून, दिसण्यावरून तिला एच.आय.व्ही.ची लागण झाली आहे की नाही हे कळू शकत नाही. एखादी व्यक्ती निरोगी दिसत असेल तरीही तिला एच.आय.व्ही.ची लागण झालेली असू शकते. त्या मुळे ज्या व्यक्तीचे अनेक

व्यक्तींशी लैंगिक सबंध येत असतील त्यानी आपल्या सर्व लैंगिक जोडीदारांसोबत लैंगिक संबंध करताना नेहमी कंडोमचा योग्य पध्दतीने वापर करायला हवा.

**६. (अ) एच.आय.व्ही. वर नियंत्रण**
एच.आय.व्ही.ची लागण नियंत्रित ठेवण्यासाठी ए.आर.टी. औषधे घ्यावी लागतात. एच.आय.व्ही. संपूर्ण नष्ट करण्यासाठी कोणतेही औषध सध्या तरी अस्तित्वात नाही.

**७. (क) 'अँटी रेट्रोव्हायरल थेरपी' (ए.आर.टी.) घेण्याचा कालावधी**
ए.आर.टी. औषधे दररोज, वेळेवर, न चुकता आयुष्यभर घ्यायची असतात.
दररोज, वेळेवर, न चुकता ए.आर.टी. औषधे घेतल्यावर कालांतराने एच.आय.व्ही. विषाणूंच्या प्रमाणात घट होते. काही व्यक्तींमध्ये एच.आय.व्ही. विषाणूंच्या प्रमाणात खूप मोठी घट होते व मग त्यांनी एच.आय.व्ही. ची चाचणी केली तर त्या चाचणीचा अहवाल 'निगेटिव्ह' म्हणून येतो. याचा अर्थ असा नाही की त्या व्यक्तीच्या शरीरातून एच.आय.व्ही. विषाणू समूळ नष्ट झाला आहे. तो शरीरातील काही भागात दडून राहातो. जर ए.आर.टी. औषधे थांबवली तर एच.आय.व्ही. विषाणूंमध्ये पुन्हा वाढ व्हायला सुरूवात होते.
सीडी ४ संख्या (CD4 Count) हे रक्तातील पांढऱ्या पेशींचे (रोगजंतूंशी लढणाऱ्या पेशी) प्रमाण दर्शवणारे एक मापक आहे. या वरून व्यक्तीच्या रोग प्रतिकारक शक्तीची स्थिती लक्षात येते. जेव्हा शरीरात एच.आय.व्ही.चे विषाणू वाढायला लागतात तेव्हा ते या पांढऱ्या पेशींवर हल्ला करतात त्यामुळे या पेशींच्या संख्येत घट होते. म्हणजे सीडी-४ संख्या कमी होते. म्हणून एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीच्या प्रतिकार शक्तीचे मापन करण्यासाठी सीडी-४ संख्या चाचणीचा उपयोग करतात.

**८. (क) एच.आय.व्ही. व क्षयरोग (TB) यांचा परस्परसंबंध**
एच.आय.व्ही. व क्षयरोगासाठी कारणीभूत असणारे जंतू वेगवेगळे आहेत. तरीही एखाद्या व्यक्तीला क्षयरोगाची लागण झाली असल्यास त्या व्यक्तीची एच.आय.व्ही.ची तपासणी सुद्धा करतात. का? तर, जेव्हा एखाद्या व्यक्तीला एच.आय.व्ही.ची लागण होते तेव्हा त्या व्यक्तीची रोग प्रतिकारक शक्ती ढासळते व त्यामुळे त्याला क्षयरोगाची लागण होण्याची शक्यता वाढते.

**९. (अ) 'अँटी रेट्रोव्हायरल थेरपी' (ए.आर.टी.) औषधांना प्रतिरोध**
ए.आर.टी. औषधे घ्यायला एक दिवस जरी खाडा केला तरीही त्या व्यक्तीमधील एच.आय.व्ही. कडून या ए.आर.टी. औषधांना प्रतिरोध निर्माण होतो. या मुळे रुग्णांनी ए.आर.टी. औषधे न चुकता दररोज, ठराविक वेळी घेणे महत्वाचे असते.
टिपणी: जे रुग्ण क्षयरोगाच्या उपचारासाठी 'DOTS' (Directly Observed Treatment Short Course) औषधे घेत असतील अशा रुग्णांनाही 'DOTS' ही औषधे नियमित ठरवून दिलेल्या कालावधी पर्यंत दररोज घेण्याचे महत्वाचे असते. ही औषधे घ्यायला लागल्यानंतर क्षयरोगाची खोकल्या सारखी लक्षणे कमी झाली की औषधे घेणे मध्येच सोडून देऊ नये. 'DOTS' औषधे मध्येच सोडून दिल्यामुळे रुग्णांच्या शरीरात क्षयरोगांच्या वरील औषधांचा प्रतिरोध निर्माण होतो व क्षयरोग बळावतो.

**१०. (अ) 'अँटी रेट्रोव्हायरल थेरपी' (ए.आर.टी.) औषधे**
सर्व वयाच्या, लिंगाच्या, लिंगभावाच्या, लैंगिकतेच्या एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तींना सरकारी ए.आर.टी. केंद्रामधून ए.आर.टी. औषधे मोफत पुरवली जातात.

**११. (ब) जंतू संसर्ग आणि लक्षणे**
एखाद्या व्यक्तीला लिंगसांसर्गिक आजार (उदा, एच.आय.व्ही., गरमी (Syphilis), परमा (Gonorrhoea), क्लॅमिडीया, इत्यादी) झाला असला तरी त्या व्यक्तीमध्ये या आजाराची लक्षणे दिसून येतीलच असे नाही. त्यामुळे जर एखाद्या व्यक्तीला लक्षणे दिसणाऱ्या अथवा लक्षणविरहीत लिंगसांसर्गिक आजार झाला असेल आणि त्या व्यक्तीने असुरक्षित (कंडोम न वापरता) लैंगिक संबंध केला तर त्या व्यक्तीकडून त्याच्या लैंगिक जोडीदाराला या लिंगसांसर्गिक आजाराची लागण होऊ शकते. म्हणून ज्या व्यक्तीचे अनेक व्यक्तींशी लैंगिक संबंध असतील त्यानी लिंगसांसर्गिक आजारांच्या लागणीपासून आणि त्यांच्या फ़ैलावा पासून वाचण्यासाठी प्रत्येक लैंगिक संबंधाचा वेळी कंडोमचा व्यवस्थित वापर करणे आवश्यक आहे.

**१२. (इ) व्ही.डी.आर.एल. (VDRL-Venereal Disease Research Laboratory) तपासणी**
वेगवेगळ्या लिंगसांसर्गिक आजारांचे एकत्रित निदान करणारी कोणतीही चाचणी उपलब्ध नाही. 'गरमी' (Syphilis) या लिंगसांसर्गिक आजाराचे निदान करण्यासाठी व्ही.डी.आर.एल. निदान चाचणी केली जाते.

**१३. (ड) कंडोम वितरण**
एखाद्या सज्ञान पुरुष देह विक्रेत्याला (पुरुष वेश्येला) कंडोम पुरवणे हा, एड्स (प्रतिरोध व नियंत्रण) अधिनियम, २०१७ नुसार, कोणत्या ही स्वरूपाचा गुन्हा नाही (फौजदारी / दिवाणी दायित्व नाही).

**१४. (अ, ब, क) एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीबाबत भेदभाव करण्यास मज्जाव**
एच.आय.व्ही.संसर्गित व्यक्तीशी, नोकरीच्या ठिकाणी, आरोग्य सेवा पुरवताना, शिक्षण देताना भेदभाव करण्यास एड्स (प्रतिरोध व नियंत्रण) अधिनियम, २०१७ नुसार मज्जाव करण्यात आला आहे.

## भाग अ: प्रभाग ३- सामाजिक मुद्दे

**१. (ब) मानसिक आरोग्यसेवेतील भेदभाव**
मानसिक आरोग्यसेवा अधिनियम, २०१७ अंतर्गत, मानसिक आजारावर उपचार घेणाऱ्या व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्याचे काही महत्वाचे मुद्दे-
१. लिंग, लिंगभाव, लैंगिक कल, धर्म, संस्कृती, जात, सामाजिक किंवा राजकीय दृष्टिकोन, किंवा अपंगत्व अशा कोणत्याही कारणाने भेदभाव करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.
२. मानसिक आजार बरा कारण्यासाठी कोणत्याही प्रकारचे अमानूष उपचार करायचे नाहीत अथवा अमानूष वागणूक द्यायची नाही.
३. मानसिक आजारपणाचे स्वरुप व केलेले उपचार या बद्दल गोपनियता पाळली जाईल.
४. भेटायला येणाऱ्या व्यक्तींची भेट स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार रुग्णाला दिला आहे.
५. आजारावर कोणत्या पद्धतीचे उपचार हवेत अथवा कोणतेही उपचार नकोत हे ठरवण्याचा अधिकार रुग्णाला दिला आहे व त्याबाबत रुग्ण आगाऊ सूचना देवून ठेवू शकतो किंवा त्यासाठी आपला प्रतिनिधी ठरवू / नेमू शकतो.

**२. (क) तृतीयपंथी व्यक्तीचा आर्थिक/ शाब्दिक / भावनिक/ लैंगिक/ शारीरिक छळ करणे**
२०१३ साली, भारतीय सर्वोच्च न्यायालयाने [NALSA विरुद्ध युनिनय ऑफ इंडीया] या खटल्याचा निकालात तृतीयपंथी व्यक्तींना तृतीयपंथी ('थर्ड जेंडर') म्हणून कायदेशीर ओळख दिली गेली. तृतीयपंथी व्यक्तीला, 'तृतीयपंथी' अशी कायदेशीर ओळख मिळण्याचा मुलभूत अधिकार आहे असे निकालात सांगितले.
या निकालाच्या आधारावर २०१९ साली 'तृतीयपंथी व्यक्ती (हक्क संरक्षण) अधिनियम' अस्तित्वात आला. या अधिनियमातील काही ठळक बाबी:

- तृतीयपंथी व्यक्तींना तृतीयपंथी म्हणून ओळखपत्र आणि कायदेशीर प्रमाणपत्र मिळण्याची तरतूद करण्यात आली.
- खालील कृत्यांना गुन्हा ठरवण्यात आले:
  १. तृतीयपंथीयांना सार्वजनिक ठिकाणी वावरण्याचा हक्क नाकारणे.
  २. तृतीयपंथी व्यक्तीला जबरदस्तीने तिचे राहण्याचे ठिकाण, म्हणजे घर / गाव / इतर रहिवासाचे ठिकाण सोडायला भाग पाडणे.
  ३. तृतीयपंथी व्यक्तीचा आर्थिक/ शाब्दिक / भावनिक/ लैंगिक/ शारीरिक छळ करणे.
- तृतीयपंथी व्यक्तींना भेदभावापासून संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने मांडलेले मुद्दे-
  १. तृतीयपंथींना शिक्षण, नोकरी / व्यवसाय, आरोग्य सेवा ई. देण्याबाबत कोणत्याही संस्था अथवा कंपनीने भेदभाव करता कामा नये.
  २. सर्वसामान्य जनतेला उपलब्ध असलेल्या कोणत्याही वस्तू, सेवा, संधी, राहण्याचे ठिकाण तृतीयपंथींनाही उपलब्ध असेल आणि ते मिळवण्यापासून त्यांना रोखता येणार नाही.
  ३. तृतीयपंथींना संचार स्वातंत्र्याचा हक्क नाकारता येणार नाही.
  ४. तृतीयपंथींना घर खरेदी करण्याचा, घरात राहाण्याचा किंवा घर भाड्याने देण्याचा हक्क नाकारता येणार नाही.
  ५. तृतीयपंथींना खाजगी किंवा सरकारी कार्यालयामध्ये काम करण्याचा किंवा कोणत्याही सरकारी किंवा खाजगी कार्यालयात पदभार स्वीकारायचा हक्क नाकारता येणार नाही.

**३. (ब) स्त्रियांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५**
ज्या स्त्रिला, तिचा कुटुंबातील कोणाही प्रौढ पुरुषाच्या हिंसाचाराला तोंड द्यावे लागत असेल, मग तो पुरुष तिच्या रक्ताच्या नात्याचा असो, किंवा तिचा नवरा असो, किंवा दत्तक नात्याचा असो, किंवा विवाहबाह्य नातेसंबंधातील ('लिव्ह-इन रिलेशनशिप') असो किंवा एकत्र कुटुंबपध्दतीत राहणारा कोणताही कौटुंबिक सदस्य असो, अशा पुरुषाकडून होणाऱ्या हिंसाचाराला रोखण्याची तरतूद हा दिवाणी अधिनियम करतो. हिंसा करणारी व्यक्ती स्त्री किंवा तृतीयपंथी असेल तर ती व्यक्ती या कायद्याखाली येत नाही.

**४. (ग) तृतीयपंथीयांसाठी आरक्षण**
[NALSA विरुद्ध युनियन ऑफ इंडिया] या खटल्याच्या निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने असे निर्देशित केले की, तृतीयपंथीयांना सामाजिक आणि आर्थिक मागास घटकांना मिळणारे आरक्षण दिले जावे. पण आजतागायत (डिसेंबर २०२३) तृतीयपंथीयांना उभे अथवा समांतर असे कोणतेही आरक्षण देण्यात आलेले नाही.

**५. (अ, ब, क) संजय गांधी निराधार योजना**
महाराष्ट्र शासनाची, संजय गांधी निराधार योजना मिळण्यासाठी जे आर्थिक, रहिवासाचे निकष असतात ते पूर्ण करण्याऱ्या तृतीयपंथी व्यक्तींना, वेश्या व्यवसायातून मुक्त झालेल्या स्त्रियांना, एच.आय.व्ही./एड्स संसर्गित व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळतो, ज्यातून, प्रत्येक महिना, एक ठराविक रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा होते.

**६. (ब) 'जेंडर डिस्फोरिया'ची वैद्यकिय चाचणी**
तृतीयपंथी म्हणून कायद्याने ओळखपत्र व प्रमाणपत्र मिळणे हा तृतीयपंथी व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. हे ओळखपत्र व प्रमाणपत्र मिळवण्यासाठी त्या व्यक्तीला कोणतीही वैद्यकीय चाचणी करावी लागत नाही. पण तृतीयपंथी व्यक्तीला जर संप्रेरके घ्यायची असतील / लिंगबदल शस्त्रक्रिया करून घ्यायची असेल तर मात्र तिला 'जेंडर डिस्फोरिया' असल्याची (दोन) वैद्यकिय प्रमाणपत्रे सादर करावी लागतात. त्या नंतरच, संप्रेरके दिली जातात / लिंगबदल शस्त्रक्रिया केली जाते.

**७. (क) तृतीयपंथी प्रमाणपत्र, ओळखपत्र जारी करण्याचा अधिकार**
तृतीयपंथी व्यक्ती ज्या जिल्ह्यात राहत असेल त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, ओळखपत्र व प्रमाणपत्र जारी करतात.
ही प्रक्रिया 'ऑन-लाईन' करता येते. याचे संकेतस्थळ- http://www.transgender.dosje.gov.in (as of December 2023). प्रत्यक्ष भेटून (ऑफ-लाईन) प्रमाणपत्र, ओळखपत्र मिळवण्याची सोय उपलब्ध नाही.

**८. (अ) अर्जात नाव आणि लिंगात बदल करण्याची तरतूद**
तृतीयपंथी म्हणून ओळखपत्र, प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जात, त्या व्यक्तीला आपले जन्माचे नाव बदलण्याची (जर बदलायचे असेल तर) आणि लिंग बदल करून घेण्याची तरतूद आहे.
उदाहरण –
१) तृतीयपंथी राजेश याचे जन्मजात लिंग 'पुरुष' होते. त्याने आपले लिंग 'तृतीयपंथी' व नाव रवीना असा बदल केलेले ओळखपत्र, प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला.
२) तृतीयपंथी रवीनाचे जन्मजात लिंग 'स्त्री' होते तिने नावात बदल न करता लिंग 'तृतीयपंथी' असा उल्लेख असलेले ओळखपत्र, प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला.
टिपणी– एखादी व्यक्ती आपले लिंग फक्त एकदाच बदलू शकते. लिंग बदलासाठी (किंवा लिंग व नाव दोन्ही बदलण्यासाठी) अर्ज करताना त्या व्यक्तीकडे तिचे आधार कार्ड असणे आवश्यक आहे.
हा अर्ज करण्यासाठी त्या व्यक्तीला विशिष्ठ स्वरूपातील प्रतिज्ञापत्र १०० रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर तयार करून त्याची स्कॅन कॉपी, आधार कार्डाची स्कॅन कॉपी, पासपोर्ट साईझ फोटो आणि त्या व्यक्तीची स्कॅन केलेली सही असे सर्व 'अपलोड' करावे लागते. याचबरोबर त्या व्यक्तीची जन्मतारीख, वडिलांचे पूर्ण नाव, शैक्षणिक पात्रता, वार्षिक उत्पन्न, सध्याचा आणि कायमचा रहिवासाचा पत्ता, ही माहिती पुरवावी लागते.

**९. (अ) तृतीयपंथी ओळखपत्र, प्रमाणपत्र कोणाला मिळू शकते?**
जी व्यक्ती स्वत:ला तृतीयपंथी म्हणून ओळखते व जिची वयाची १८ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा कोणत्याही व्यक्तीला, तृतीयपंथी म्हणून ओळखपत्र, प्रमाणपत्र मिळू शकते.

**१०. (ब) आधारकार्ड अद्ययावत करणे**
तृतीयपंथी म्हणून ओळखपत्र, प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ती व्यक्ती तृतीयपंथी प्रमाणपत्राच्या आधारे, तृतीयपंथी प्रमाणपत्रावरील माहिती नुसार, आपल्या आधार कार्डावरील नावात, लिंगात बदल करु शकते. UIDAI संकेतस्थळावर आधार कार्डावरील नाव / लिंगात बदल करुन ते अद्ययावत करण्याची सुविधा आहे.

**११. (अ) संप्रेरक घेण्यासाठी / लिंगबदल शस्त्रक्रिया करण्यासाठीच्या पूर्वअटी**
संप्रेरके घेण्याने / लिंगबदल शस्त्रक्रियांमुळे शरीरात होणारे बदल कायम स्वरूपाचे असतात. म्हणून 'जेंडर डिस्फोरिया' चे निदान दोन मानसोपचारतज्ञांद्वारे करण्यात येते; गरजेनुसार समुपदेशन दिले जाते व या नंतरच दोन मानसोपचारतज्ञांनी स्वतंत्रपणे 'जेंडर डिस्फोरिया' असल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर संप्रेरक घेता येतात / लिंगबदल शस्त्रक्रिया करता येऊ शकते.

**१२. (अ, ब, ड, इ, ग) 'तृतीयपंथी'ची अधिनियमानुसार व्याख्या**
तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ नुसार तृतीयपंथी व्यक्तीची व्याख्या करताना त्यात विविध लिंगभावांच्या व्यक्तींना सामावून घेण्यात आले आहे. या मध्ये तृतीयपंथी, ट्रांसवुमन, ट्रान्समन, द्विलिंगी व्यक्ती आणि ज्या व्यक्ती आपली विशिष्ट सांस्कृतिक ओळख बाळगतात उदा. हिजडा, जोगते या सर्वांना या व्याख्येत समाविष्ट केलं गेलं आहे.
**महत्वाचे:** तृतीयपंथी / हिजडा ओळख बाळगण्यासाठी कोणत्याही वैद्यकीय दाखला अथवा शस्त्रक्रियेची आवश्यकता नाही.

## भाग अ: प्रभाग ४- कायदे

**१. (ब) 'जेंडर'**
भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ८ अन्वये स्त्री व पुरुष या दोनच लिंगभावांचा अंतर्भाव करण्यात आला होता.
भारतीय दंड संहिता, २०२३ च्या प्रस्तावित आराखड्यात, कलम २(९) अंतर्गत स्त्री, पुरुष, आणि तृतीयपंथी अशा तीन लिंगभावांचा अंतर्भाव केला गेला आहे.

**२. (अ) दखलपात्र गुन्हा व अदखलपात्र गुन्हा**
गंभीर स्वरूपाचे गुन्हे दखलपात्र असतात. अशा गुन्ह्याचा आरोप असलेल्या संशयित व्यक्तीला पोलीस, पकड वॉरंट शिवाय तात्काळ अटक करू शकतात.
जेव्हा एखादा दखलपात्र गुन्हा घडतो तेव्हा तो गुन्हा ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडला असेल तिथे तक्रारदाराने प्रथम माहिती अहवाल (एफ.आय.आर.) नोंदवायचा असतो. काही दखलपात्र गुन्हे अजामीनपात्र असतात तर काही दखलपात्र गुन्हे हे जामिनपात्र असतात.
भारतीय दंड संहिता १८६० च्या शेड्युल १ मध्ये दखलपात्र व अदखलपात्र गुन्ह्यांची यादी दिली आहे.

जे गुन्हे अदखलपात्र म्हणून सूचीबद्ध केले आहेत त्या गुन्ह्यांसाठी पोलीस चौकीत तक्रार दाखल करता येते. हे गुन्हे तुलनेने सौम्य स्वरुपाचे गुन्हे असतात. न्यायदंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय, पोलिस अदखलपात्र गुन्ह्यांसंदर्भात, तपास सुरु करू शकत नाहीत. अदखलपात्र गुन्ह्याचा तपास पोलिसांनी करावा, अशी इच्छा असेल तर, चौकीत तक्रार केल्यानंतर, फिर्यादी, फौजदारी प्रक्रिया संहिता (१९७३) चे कलम २०० अन्वये न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग न्यायालय यांच्या कडे खाजगी तक्रारअर्ज दाखल करून पोलीस तपास सुरू करण्याचे आदेश मिळवू शकतो.

**३. (क) जामीनपात्र, अजामीनपात्र गुन्हा**

जामीनपात्र गुन्ह्यांमध्ये आरोपीला पोलीसांकडून किंवा न्यायालयाकडून जामीन मिळतो. जामीनपात्र गुन्ह्यांमध्ये पोलिस/न्यायालय जामीन नाकारू शकत नाहीत. जामीनपात्र गुन्हा हा तुलनेने सौम्य स्वरुपाचा गुन्हा असतो.

अजामीनपात्र गुन्ह्यांमध्ये पोलीस जामीन मंजूर करू शकत नाहीत. आरोपीला जामीन देणे हे न्यायालयाच्या अखत्यारीत असते. न्यायालयाकडून अशा आरोपीला काही अटी, शर्तीवर जामीन दिला जाऊ शकतो. (उदा, आरोपीने पोलीस चौकी/न्यायालय इथे बोलावले जाईल तेव्हा हजर रहाणे / हमीपत्र अथवा जामीनपत्र सादर करावे लागणे.) सामान्यपणे जामीन मिळणे हा नियम आणि तुरुंगवास हा अपवाद हे तत्व अवलंबले जाते.

**४. (ब) आपसात मिटवण्याजोगा गुन्हा (Compoundable Offence) व आपसात मिटवता न येणारा गुन्हा (Non-compoundable Offence)**

जे गुन्हे आपसात मिटवण्याजोगे असतात अशा गुन्ह्यांमध्ये तक्रारदार आणि आरोपी हे आपसात सहसंमतीने प्रकरण मिटवू शकतात. तक्रारदार हा, आरोपी विरुद्ध केलेले आरोप मागे घ्यायला तयार असतो/होतो. तुलनेने सौम्यस्वरुपाचे गुन्हे हे आपसात मिटवण्याजोगे असतात. आपसात मिटवण्याजोगे जे गुन्हें असतात त्यांचे दोन प्रकार आहेत.

१) काही गुन्ह्यांमध्ये न्यायालयाच्या परवानगीशिवाय प्रकरण आपसात मिटवता येते.

२) काही गुन्ह्यांमध्ये प्रकरण आपसात (तक्रारदार आणि आरोपी यांच्यात) मिटवण्यासाठी कोर्टाची परवानगी घेणे आवश्यक असते. (या गुन्ह्यांची यादी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३२० मध्ये दिली आहे.)

गंभीर स्वरुपाचे गुन्हे आपसात मिटवण्याजोगे नसतात आणि त्यामुळे ते तक्रारदार आणि आरोपी यांच्यामध्ये आपसात मिटवता येत नाहीत.

**५. (ब) पोलीसांकडे तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया**

जर पोलीस तक्रार दाखल करून घेण्यात सहकार्य करत नसतील / टाळाटाळ करत असतील तर-

- पर्याय १: पीडीत व्यक्ती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना (सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) किंवा पोलीस उप-आयुक्त (DyCP) किंवा पोलिस आयुक्त/अधीक्षक (CP/SP) यांना भेटून पोलिसांनी तक्रार दाखल करून घ्यावी अशी विनंती करु शकते.
- पर्याय २: हा गुन्हा घडलेल्या ठिकाणाच्या हद्दीचे पोलीस आयुक्त (CP) / पोलीस अधीक्षक (SP) यांना पत्र लिहून, त्या पत्रामध्ये थोडक्यात तक्रारीचे वर्णन, कोणत्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हा घडला, कोणत्या स्थळी घडला गुन्ह्याची तारीख, वेळ, पीडीत व्यक्तीचे नाव, संपर्काचा पत्ता, फोन नंबर व जर माहिती असेल तर आरोपीचे नाव, पत्ता, फोन नंबर द्यावा.
- पर्याय ३: या नंतरही पुरेशा अवधीत जर पीडीत व्यक्तिच्या तक्रारीची दखल घेतली गेली नाही तर ती व्यक्ती फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ प्रकरण २०० अंतर्गत, त्या हद्दीच्या न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्याकडे खाजगी तक्रार दाखल करू शकते. (टिपणी: पीडीत व्यक्तीने प्रथम पोलीसांकडे तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला नसल्यास, न्यायालय खाजगी तक्रारीची सहसा दखल घेत नाही.)
- पर्याय ४: पोलीस तक्रार निवारण प्राधिकरणाकडे पोलिसांविरुद्ध तक्रार करता येते.

**६. (अ, ब, क, ड, इ, फ) एलजीबीटीआयक्यू समुदायातील पीडीतांना सहाय्य करण्यामध्ये पोलीसांकडून होणारा भेदभाव**

पोलीसांकडून होणाऱ्या भेदभावामुळे / दिल्या जाणाऱ्या असंवेदनशील वागणूकीमुळे एलजीबीटीआयक्यू पीडीत व्यक्तीचा आत्मविश्वास खचतो. त्या व्यक्तीवर अन्याय होत राहतो. पोलिसांकडून मदत मिळाली नाही, तर दाद कोणाकडे मागायची असा प्रश्न पडतो. ती व्यक्ती हताश होते व सर्वच पोलीस यंत्रणा असंवेदनशील आहे अशी धारणा निर्माण होते.

**७. (ब) समलिंगी संभोग**

भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३७७ ला आव्हान देणाऱ्या [नवतेजसिंग जोहर विरुद्ध युनियन ऑफ इंडीया] या खटल्याचा निकाल देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने असे घोषित केले की दोन प्रौढ व्यक्तींमधील संमतीने झालेल्या समलिंगी संभोगाला गुन्हा ठरवणारे ३७७ कलम हे असंविधानिक आहे. ६ सप्टेंबर २०१८ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ५ न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा महत्वपूर्ण निकाल जाहीर केला.

हे कलम (३७७) भारतीय दंड संहिता, २०२३ च्या प्रस्तावित आराखड्यातून वगळण्यात आले आहे.

**महत्वाचे:** दोन प्रौढ व्यक्तींनी संमतीने केलेला समलिंगी संभोग बेकायदेशीर नाही.

**८. (ब) तृतीयपंथीयांच्या विरोधात घडणारे गुन्हे**
तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ प्रकरण १८ अंतर्गत तृतीयपंथीयां विरुद्ध घडणारे गुन्हे सूचीबध्द केले आहेत. ते अदखलपात्र आणि जामीनपात्र गुन्हे आहेत.
टिपणी- जेव्हा अधिनियमामध्ये एखादा गुन्हा कोणत्या वर्गात बसतो (म्हणजे तो गुन्हा दखलपात्र / अदखलपात्र; जामीनपात्र / अजामीनपात्र) या विषयी उल्लेख नसेल तर अशावेळी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या शेड्युल १- भाग २ मध्ये त्याचे वर्गीकरण मिळते.

**९. (अ, ब, क, ड) तृतीयपंथीयांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या 'राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरण' (NALSA) निर्णयाचे ठळक मुद्दे-**
['राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरण' (National Legal Services Authority (NALSA)) विरुद्ध युनियन ऑफ इंडिया] या प्रकरणात सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या निर्णयातील ठळक मुद्दे-
१. या निकालाद्वारे तृतीयपंथीयांना तृतीयपंथी ('थर्ड जेंडर') म्हणून कायदेशीर मान्यता मिळाली.
२. तृतीयपंथीयांना त्यांच्या लिंगभावामुळे होणाऱ्या भेदभावापासून प्रतिबंधित करण्यात आले.
३. तृतीयपंथीयांचा समावेश सामाजिक, आर्थिक मागास घटकांमध्ये करून त्यांना शिक्षण आणि नोकरी मध्ये आरक्षण मिळावे असे सांगितले.
४. शासनाला सूचित करण्यात आले की तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र एच.आय.व्ही. उपचार केंद्रे चालू केली जावीत.

**१०. (अ, ब, क, फ, ग) घटनापीठ**
भारतीय दंड संहिता १८६०, कलम ३७७ च्या संविधानकतेला आव्हान देणाऱ्या [नवतेजसिंग जोहर विरुद्ध युनियन ऑफ इंडीया] या खटल्यासाठी स्थापन केलेल्या घटनापीठामध्ये तत्कालीन माननीय सरन्यायाधिश दीपक मिश्रा, न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. फली नरीमन, न्या. खानविलकर आणि न्या. इंदू मल्होत्रा यांचा समावेश होता. हा निकाल ६ सप्टेंबर २०१८ रोजी दिला गेला.
[राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरण (National Legal Services Authority (NALSA)) विरुद्ध युनियन ऑफ इंडीया] या निकालाद्वारे तृतीयपंथीयांना तृतीयपंथी ('थर्ड जेंडर') म्हणून कायदेशीर मान्यता मिळाली. हा निकाल, १५ एप्रिल २०१४ रोजी, माननीय न्या. के. एस. राधाकृष्णन आणि न्या. ए. के. सिक्री यांनी दिला.

**११. (अ) पोलीस भरती**
ज्या व्यक्तीकडे जिल्हाधिकाऱ्याने दिलेले तृतीयपंथी म्हणून ओळखपत्र आहे अशी व्यक्ती तृतीयपंथी श्रेणीत महाराष्ट्रात पोलीस भरती साठी अर्ज करू शकते.
२०२२ साला पर्यंत महाराष्ट्र पोलीस शिपाई भरती प्रक्रियेमध्ये फक्त स्त्री, पुरुष यांनाच अर्ज करण्याची परवानगी होती. काही तृतीयपंथी कार्यकर्त्यांनी 'महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणा'कडे (MAT- Maharashtra Administrative Tribunal) धाव घेतली. त्या नंतर पोलीस भरती प्रक्रीयेमध्ये अर्ज करण्यासाठी तृतीयपंथी हा पर्यायही दिला जावा, असे निर्देश 'MAT'ने राज्यशासनाला दिले. या आदेशाविरोधात राज्यशासनाने उच्च न्यायालयात धाव घेतली. मुंबई उच्च न्यायालयाने 'MAT'ने दिलेल्या निर्देशांना कायम ठेवले.

**१२. (ब) पाठलाग (Stalking)**
भारतीय दंड संहिता १८६०, कलम ३५४ड अंतर्गत पुरुषाने स्त्रीचा पाठलाग करणे गुन्हा आहे. पण सध्यातरी, भारतीय दंड संहिता, १८६० मध्ये पुरुषाचा पाठलाग करणे गुन्हा ठरवलेले नाही.

**१३. (ब) मर्जीविरुद्ध डांबून ठेवलेल्या व्यक्तीला शोधण्यासाठी शोध वॉरंट (Search Warrant)**
पर्याय १. एखाद्या व्यक्तीला तिच्या मर्जीविरुद्ध तिच्या घरात डांबून ठेवले असल्यास, त्या व्यक्तीला शोधण्यासाठी शोध वॉरंट जारी करण्याचा अधिकार न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांना, फौजदारी प्रक्रिया संहिता (१९७३) च्या कलम ९७ अन्वये देण्यात आला आहे. हा आदेश जारी केल्यानंतर डांबून ठेवलेल्या व्यक्तीची सुटका करून पोलीस तिला न्यायदंडाधिकाऱ्यांच्या समोर हजर करतात.
उदा. समलिंगी (गे) पुरुष / समलिंगी स्त्री / तृतीयपंथी यांना जर त्यांच्या मर्जीविरुद्ध घरात डांबून ठेवले असेल तर त्यांचे मित्र / सहकारी /कार्यकर्ते न्यायालयात जाऊन त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न करु शकतात.
पर्याय २: उच्च न्यायालयात जाऊन, संविधानाच्या कलम २२६ च्या आधारे त्या व्यक्तीला उच्च न्यायलयात हजर करण्याचे आदेश मिळवू शकतात.
पर्याय ३: सर्वोच्च न्यायालयात जाऊन भारतीय संविधानाच्या कलम ३२ आधारे त्या व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयात हजर करण्याचे आदेश मिळवू शकतात.
टिपणी- थेट सर्वोच्च न्यायालयात गेल्यास, सर्वोच्च न्यायालयाकडून हे प्रकरण खालच्या कोर्टाकडे वर्ग केले जाऊ शकते. त्यामुळे शक्यतो पर्याय १ किंवा पर्याय २ चा वापर केला जातो.

**१४. (क) माहिती आणि तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६अ**
माहिती आणि तंत्रज्ञान अधिनियम २००० चे प्रकरण ६६अ, २०१५ साली सर्वोच्च न्यायालयाने असंविधानिक म्हणून घोषित केले.
[श्रेया सिंघल विरुद्ध युनियन ऑफ इंडिया] या प्रकरणात ६६अ कलमाच्या संविधानकतेला आव्हान देण्यात आले. ६६अ कलम कॉम्पुटर अथवा इतर संदेश यंत्रणेद्वारे आक्षेपार्ह माहिती पाठवणे गुन्हा ठरवते. हे कलम संदिग्ध शब्दांत लिहीले गेले असल्यामुळे ('आक्षेपार्ह' ह्या शब्दाचा अर्थ दृष्टीकोनाप्रमाणे वेगवेगळा लागू शकतो), या कायद्याची अंमलबजावणी करताना या कलमाचा गैरवापर

केला जातो / जाऊ शकतो या मुद्यावर हे कलम असंवैधानिक ठरण्यात यावे असा युक्तिवाद करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केला.

**१५. (अ) दोन समलिंगी व्यक्तींनी 'लिव्ह-इन रिलेशनशिप' मध्ये राहणं**
**महत्वाचे:** भारतामध्ये, १८ वर्षं पूर्ण झालेल्या दोन समलिंगी पुरुषांनी किंवा दोन समलिंगी स्त्रियांनी 'लिव्ह-इन रिलेशनशिप' मध्ये स्वखुशीने राहणं हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे.

**१६. (क) प्रतिबंधात्मक आदेश**
जर एखादी सज्ञान समलिंगी स्त्री, तिच्या मर्जीने तिच्या सज्ञान समलिंगी स्त्री जोडीदाराच्या घरी, 'लिव्ह-इन रिलेशनशीप' मध्ये राहत असेल आणि या मुळे तिला तिच्या कुटुंबाकडून त्रास देण्यात येत असेल / धमकावण्यात येत असेल / तिला तिच्या स्त्री जोडीदाराला सोडून देण्यासाठी कुटुंबियांकडून दबाव आणला जात असेल, तर ती स्त्री (किंवा तिची जोडीदार) न्यायालयात जाऊन, विशिष्ट मदत अधिनियम, १९९१ अन्वये, तिच्या कुटुंबाविरुद्ध प्रतिबंधात्मक आदेश मिळवू शकते.

**१७. (अ, ब, ड, इ, फ) समलिंगी विवाह**
दिलेल्या यादीतील पाकीस्तान देश सोडल्यास- फ्रान्स, उरुग्वे, मेक्सिको, ब्राझील, तैवान या देशात समलिंगी विवाहाला कायद्याने मान्यता आहे.

**१८. (ब) विवाह व मूलभूत अधिकार**
भारतात, विवाह करणे हा, व्यक्तीचा मूलभूत अधिकार नाही.
*(संदर्भ [सुप्रियो विरुद्ध यूनिअन ऑफ इंडिया] (WP (Civil) No. 1011 of 2022) (समलिंगी विवाह याचिका) चा १७ ऑक्टोबर २०२३ चा निकाल.)*

**१९. (अ, ब, क, ड) 'विशेष विवाह अधिनियम', १९५४ अंतर्गत विवाह**
पुरुष व स्त्री, पुरुष व तृतीयपंथी, ट्रान्समन व तृतीयपंथी, ट्रान्समन व स्त्री या जोडप्यांना, विशेष विवाह अधिनियम, १९५४ अंतर्गत, विवाह करता येतो.
सध्यातरी (डिसेंबर २०२३) भारतामध्ये समलिंगी विवाहाला कायद्याची मान्यता नाही.
**महत्वाचे:** दोन प्रौढ पुरुष किंवा दोन प्रौढ स्त्रिया वैदिक पद्धतीने विवाहाचे विविध विधी करू शकतात, पण असे विधी केले तरी ते त्या समलिंगी जोडप्याच्या समाधानासाठी असतात. त्या विधींना कायद्याने लग्न म्हणून मान्यता नाही. विवाहाला मान्यता नसली, तरी १८ वर्षं पूर्ण झालेल्या दोन पुरुष किंवा दोन स्त्रिया 'लिव्ह-इन रिलेशनशिप' मध्ये स्वखुशीने राहू शकतात; तो त्यांचा मूलभूत अधिकार आहे.
*(संदर्भः [सुप्रियो विरुद्ध यूनिअन ऑफ इंडिया] (WP (Civil) No. 1011 of 2022) (समलिंगी विवाह याचिका) चा १७ ऑक्टोबर २०२३ चा निकाल.)*

## परिशिष्ट अ: शब्दकोश

शब्दसंकलन: बिंदूमाधव खिरे, सुरेश खोले, पुष्कर एकबोटे, सौरभ बोंद्रे

टिपणी: क्विअर, ट्रान्समन, ट्रान्सवुमन, सीसजेंडर या शब्दांना मराठी / हिंदी मध्ये, सोपे, पर्यायी शब्द उपलब्ध नसल्यामुळे एलजीबीटीआयक्यू समुदायातील बहुतांश सदस्य हे इंग्रजी शब्दच वापरतात.

| **इंग्रजी शब्द** | **जवळचा मराठी शब्द** | **ढोबळ अर्थ** |
|---|---|---|
| Biological Sex | लिंग (शारिरीक लिंग) | शरीराची जननेंद्रिये |
| Female | स्त्री | जननेंद्रीये स्त्रीची व लिंग-गुणसुत्र XX |
| Male | पुरुष | जननेंद्रीये पुरूषाची व लिंग-गुणसुत्र XY |
| Intersex | द्विलिंगी | ज्या व्यक्तीला काही अंशी स्त्रीची व काही अंशी पुरूषाची जननेंद्रिये असतात / ज्यांची लिंग-गुणसुत्र XX किंवा XY यापेक्षा वेगळी असतात / ज्यांच्या दोन गोनॅड्स (Gonads) मध्ये संलग्नता नसते अशा व्यक्ती. |
| Gender Identity | लिंगभाव | आपण जग स्त्रीच्या का पुरुषाच्या नजरेतून बघतो व अनुभवतो तो आपला लिंगभाव असतो. |
| Cisgender | सीसजेंडर (इंग्रजी शब्द) | ज्या व्यक्तीचे शरीर व लिंगभाव एकरूप आहेत / संलग्न आहेत अशी व्यक्ती. बहुतेक व्यक्ती 'सीसजेंडर' असतात.<br>उदा. १: शरीराने पुरुष व लिंगभाव पुरुषाचा.<br>उदा. २: शरीराने स्त्री व लिंगभाव स्त्रीचा. |
| Transgender | तृतीयपंथी/ पारलिंगी | ज्या व्यक्तीचे शारीरिक लिंग व लिंगभाव यात संलग्नता नाही अशी व्यक्ती. |
| Pangender | पॅनजेंडर (इंग्रजी शब्द) | जी व्यक्ती स्त्री व पुरुष या दोन्ही लिंगभावाचे काही पैलूं अनुभवते अशी व्यक्ती. |
| Agender | लिंगभाव रहित | जी व्यक्ती कोणत्याच लिंगभावाचे पैलूं (स्त्री अथवा पुरुष) अनुभवत नाही अशी व्यक्ती. |
| Binary, Non-Binary | बायनरी, नॉन-बायनरी (इंग्रजी शब्द) | पूर्वी समज होता की दोनच लिंगभाव असतात- स्त्री व पुरुष (म्हणून 'बायनरी' शब्द (म्हणजे दोन विभागात रचना) वापरला जायचा. आता वैद्यकीय शास्त्र मानते की लिंगभावाचे अनेक प्रकार आहेत / छटा आहेत. बायनरी (स्त्री/पुरुष) लिंगभवाव्यतिरिक्त लिंगभाव असलेली व्यक्ती स्वतःचा लिंगभाव 'नॉन-बायनरी' म्हणून सांगते. |
| Gender-fluid | अस्थिर लिंगभावाची व्यक्ती | ज्या व्यक्तीचा लिंगभाव कायमस्वरूपी पुरुषाचाही नाही व स्त्रीचाही नाही; ज्यांचा लिंगभाव कधी स्त्रीचा तर कधी पुरुषाचा असा अस्थिर असतो अशा व्यक्तींना अस्थिर लिंगभावी म्हणतात. |
| Gender Affirmative Surgery (GAS) (old term- Sex Reassignement Surgery) | लिंगबदल शस्त्रक्रिया | १) पुरुष -> स्त्री: शस्त्रक्रियेद्वारे पुरुषाची जननेंद्रीये (सर्व किंवा काही भाग) काढून स्त्रीच्या जननेंद्रियांचीची घडण करणे.<br>२) स्त्री -> पुरुष: शस्त्रक्रियेद्वारे स्त्रीची जननेंद्रिये (सर्व किंवा काही भाग) काढून पुरुषाच्या जननेंद्रीयांची घडण करणे. |
| Sex Assignment Surgery (SAS) | लिंग घडवण्याची शस्त्रक्रिया | प्रौढ द्विलिंगी व्यक्तीच्या संमतीने तिचा लिंगभावाशी संलग्न असलेली जननेंद्रिये ठेवून बाकीची जननेंद्रिये शस्त्रक्रियेद्वारे काढून टाकणे. |
| Drag | ड्रॅग (इंग्रजी शब्द) | विशिष्ट कार्यक्रमात ज्या व्यक्ती आपल्या शारीरिक लिंगाच्या विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीची भडक व अतिश्योक्ती वेषभूषा करतात अशा व्यक्ती. |
| Sexual Orientation | लैंगिक कल | आपल्याला कोणत्या लिंगाच्या व्यक्तीबद्दल आयुष्यभर लैंगिक आकर्षण जाणवते तो आपला लैंगिक कल असतो. |
| Heterosexual Orientation | भिन्नलिंगी/ विषमलिंगी (लैंगिक कल) | अशा व्यक्तींना फक्त विरुद्ध लिंगाच्या व्यक्तींबद्दल आयुष्यभर लैंगिक आकर्षण असते. |
| Bisexual Orientation | उभयलिंगी (लैंगिक कल) | अशा व्यक्तींना स्त्रीबद्दल व पुरुषाबद्दल आयुष्यभर लैंगिक आकर्षण असते. |
| Homosexual Orientation / Gay | समलिंगी (लैंगिक कल) | अशा व्यक्तींना त्यांच्याच लिंगाच्या व्यक्तीबद्दल आयुष्यभर लैंगिक आकर्षण असते. |

| | | |
|---|---|---|
| Pansexual | मुक्तलिंगी | ज्या व्यक्तीला कोणतीही शरीररचना असलेल्या, कोणताही लिंगभाव असलेल्या व्यक्तीबद्दल लैंगिक आकर्षण वाटते अशी व्यक्ती. |
| Asexual | अलैंगिक | ज्या व्यक्तीला दीर्घकाळ कोणाबद्दल ही लैंगिक आकर्षण वाटत नाही अशी व्यक्ती. |
| Insertive(Top) | गमनी | लैंगिक संबंधात पुरुषाची भूमिका घेणे. |
| Receptive (Bottom) | स्वीकृत | लैंगिक संबंधात स्त्रीची भूमिका घेणे. |
| Versatile | स्वीकृत व गमनी दोन्ही भूमिका | लैंगिक संबंधांमध्ये स्वीकृत व गमनी दोन्ही भूमिका घेणे. |
| Closet | अव्यक्त | ज्या व्यक्तीने आपली लैंगिकता अथवा लिंगभाव इतरांना सांगितलेला नाही अशी व्यक्ती. |
| Come out / Coming Out | व्यक्त करणे / सांगणे | आपली लैंगिकता अथवा लिंगभाव इतरांना सांगणे (उदा. एखाद्या व्यक्तीने आपल्या मित्राला किंवा पालकांना आपण समलिंगी आहोत हे सांगणे जे आजवर त्यानी समाजाच्या भितीपोटी गुपीत ठेवलं होतं.) |
| LGBTIQA | | L-लेस्बियन, G- गे, B- बायसेक्सुअल, T- ट्रांन्सजेंडर,<br>I- इंटरसेक्स, Q- क्विअर, A- असेक्सुअल |
| Queer | क्विअर (इंग्रजी शब्द) | हा शब्द सामान्यतः दोन अर्थी वापरला जातो.<br>१) आपला लिंग / लिंग भाव / लैंगिकतेबद्दल साशंकता आहे, मनात गोंधळ आहे अशा व्यक्ती.<br>२) सर्व लैंगिक अल्पसंख्यांक व्यक्तींना एकत्रितपणे संबोधण्यासाठी उदा. समलिंगी, द्विलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी इ. |

**'हिजडा' शब्द वापरण्याबाबत टिपणी**

तृतीयपंथी व्यक्तींचा (स्त्रीचा लिंगभाव असणारे पुरुष) भारतीय समाजात प्रदीर्घ सांस्कृतिक परंपरा असलेला समाज म्हणजे हिजडा / किन्नर समाज. तृतीयपंथी व हिजडा हे शब्द मुख्यतः दोन अर्थाने वापरले जातात.

१. हिजडा घराण्यांमध्ये नव्याने दाखल होणारा तृतीयपंथी 'रीत टाकून' एका वरिष्ठ तृतीयपंथीयाचा (त्याला 'गुरु' म्हणतात) चेला बनतो. (त्या गुरूच्या छत्रछाये खाली येतो). गुरुंचे त्यांच्या चेल्यांच्या आयुष्यावर लक्षणीय नियंत्रण असते. हिजडा समाजातील व्यक्तींचा उदरनिर्वाह सहसा- 'मंगती करणे' (पैसे मागणे), नवजात बाळाला आर्शिवाद देऊन पैसे घेणे, समारंभांमध्ये नाच करणे किंवा वेश्याव्यवसाय करणे या वर होतो. नोकरी करणाऱ्यांची संख्या खूप कमी आहे. काही जण लिंगबदल शस्त्रक्रीया करून घेतात तर काही जण, वेगवेगळ्या कारणांमुळे, ही शस्त्रक्रिया करुन घेत नाहीत.

उदा. "माझं नाव शीतल आहे, आणि मी हिजडा आहे." याचा अर्थ शीतल ही तृतीयपंथी आहे आणि हिजडा समाजाची सदस्य आहे.

**महत्वाचे:** सर्व हिजडा समाजातील व्यक्ती या जन्माने शारीरिक लिंग पुरुषाचे व लिंगभाव स्त्रीचा असणारे तृतीयपंथी व्यक्ती असतात. पण शारीरिक लिंग पुरुषाचे आणि लिंगभाव स्त्रीचा असणारे सर्वच तृतीयपंथी व्यक्ती हिजडा समाजाचे सदस्य असतातच असं नाही. ज्यांना घरी स्वीकारलं जातं, जे शिकतात व मुख्य प्रवाहात चांगल्या प्रकारे एकरूप होऊन नोकरी किंवा उद्योग, व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवतात ते सहसा हिजडा समाजाचे सदस्य होत नाहीत. म्हणजे ते कोणा तृतीयपंथीयाला गुरु करून घेत नाहीत. असे 'रीत' न घेतलेले अनेक जण स्वतःला तृतीयपंथी मानत नाहीत तर स्वतःला 'ट्रान्सवूमन' मानतात व स्त्री ची जीवनशैली जगतात.

२. काही वेळा लोक एखाद्या पुरुषाच्या पौरुषत्वावर शंका घेऊन त्याचा अपमान करण्यासाठी 'हिजडा' हा शब्द शिवी म्हणून वापरतात. हिजडा हा शब्द हिणवण्यासाठी, अपमान करण्यासाठी वापरू नये.

**खालील शब्दांचा वापर कटाक्षाने टाळावा**

समलिंगी पुरुष आणि तृतीयपंथीयांना हिणवण्यासाठी किंवा एखाद्या पुरुषाच्या पौरुषत्वावर शंका घेऊन त्यांचा अपमान करण्यासाठी खालील मराठी/हिंदी शब्दांचा वापर केला जातो. हे शब्द वापरणे कटाक्षाने टाळावे.

- हिंदी/मराठी शब्द: गांडू, छक्का, नामर्द
- मराठी शब्द: बुळ्या
- इंग्रजी शब्द: fag, pansy, fruit

*(टिपणी: वर दिलेल्या काही व्याख्या 'संचार मिडीया गाईड' (भारतातील लैंगिक अल्पसंख्यांकाविषयी वापरण्यात यावी अशी सकारात्मक भाषेबाबतची कार्यपुस्तिका, कॉपीराईट: हमसफर ट्रस्ट, २०१५) मधून घेण्यात आल्या आहेत.)*

## परिशिष्ट ब: बिंदुमाधव खिरे यांनी लिहीलेली पुस्तके

खालील सर्व पुस्तकांची संगणकीय प्रत (e-copy in .pdf format) पुढील संकेतस्थळावर मोफत उपलब्ध आहे-
http://www.bindumadhav.com

**इंग्रजी पुस्तके**
१) हॅन्डबुक ऑन एलजीबीटीआयक्यू इनक्ल्यूजन इन द वर्कप्लेस (बिंदू क्विअर राईट्स फाउंडेशन, २०२३)
२) वर्कींग टूगेदर: ब्रिजिंग द गॅप बिटविन एलजीबीटीआयक्यू अँड मेडीकल प्रॅक्टीशनर्स (बिंदुमाधव खिरे, २०२२)
३) बेसीक्स ऑफ सेक्स, जेंडर, सेक्सूऍलिटी (डॉ. भूषण शुक्ल, बिंदुमाधव खिरे, २०२१)
४) मॅन्युअल: बेसिक्स ऑफ एलजीबीटीआयक्यू इनक्यूलजन इन हॉस्पीटल्स (बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन, २०२०)
५) मॅन्युअल: लिगल टिप्स फॉर सोशल वर्कर्स वर्किंग ऑन एलजीबीटीआयक्यू इश्यूज (बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन, २०२१)
६) नो मॅन्स लॅन्ड- ए मेमॉअर ऑफ अ गे ऍक्टीव्हीस्ट (बिंदुमाधव खिरे, २०२०)

**मराठी पुस्तके**
१) पार्टनर (लघु कादंबरी) (बिंदुमाधव खिरे, २००४)
२) लैंगिक शिक्षण, लैंगिकता, एचआयव्ही/एड्स हेल्पलाईन मार्गदर्शिका (समपथिक ट्रस्ट, पुणे, २००७)
३) इंद्रधनु: समलैंगिकतेचे विविध रंग (समपथिक ट्रस्ट, पुणे, २००८)
४) मानवी लैंगिकता: एक प्राथमिक ओळख (समपथिक ट्रस्ट, पुणे, २०११)
५) इंटरसेक्स: एक प्राथमिक ओळख (समपथिक ट्रस्ट, पुणे, २०१५)

**संपादित केलेली मराठी पुस्तके**
१) अंतरंग (समलिंगी स्त्री, पुरुषांच्या सत्यकथांचे संकलन) (समपथिक ट्रस्ट, पुणे, २०१३)
२) सप्तरंग (तृतीयपंथी आणि ट्रांन्सजेंडर व्यक्तींच्या सत्यकथनांचे संकलन) (समपथिक ट्रस्ट, पुणे, २०१३)
३) मनाचिये गुंती (समलिंगी मुला-मुलींच्या पालकांची मनोगते) (समपथिक ट्रस्ट, पुणे, २०१३)
४) 'ब्यूटीफुल पीपल' ('मनाचिये गुंती' या मराठी पुस्तकाचा 'ब्यूटीफुल पीपल' हा इंग्रजी अनुवाद) (समपथिक ट्रस्ट, पुणे, २०१६)

## परिशिष्ट क: लेखक परिचय

बिंदुमाधव खिरे
संपर्क- bindumadhav.khire@gmail.com

बिंदुमाधव खिरे यांचा जन्म २१ जुन १९६८ रोजी पुण्यात झाला. ते एलजीबीटीआयक्यू समाजाच्या अधिकारांवर काम करणारे कार्यकर्ते आहेत व २००० सालापासून पुण्यामध्ये एलजीबीटीआयक्यू समुदायाच्या हक्कांसाठी कार्यरत आहेत. त्यांनी संगणकशास्त्रामधून अभियंता ही पदवी प्राप्त केली आहे. तसेच कायद्याची पदवी मिळवली आहे.

बिंदुमाधव यांनी माहितीतंत्रज्ञान क्षेत्रातून वयाच्या ३५व्या वर्षी स्वेच्छा निवृत्ती घेतली आणि त्यानंतर २००२ साली पुण्यात 'समपथिक ट्रस्ट' ची स्थापना केली. २०१९ साली त्यांनी 'बिंदू क्विअर राईट्स फाऊंडेशन' ची स्थापना केली. 'बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन' एलजीबीटीआयक्यू समुदायाच्या हक्कांसाठी काम करते.